लोकशाही वार्ता
# चंद्रपूर
गुड मॉर्निंग
नागपूर, मंगळवार, २१ जानेवारी २०२५/९
epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta

### विष प्राशन केलेल्या व्यक्तीचा मृत्यू

**लोकशाही वार्ता/वर्धा**

विष प्राशन केलेल्या व्यक्तीचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. याप्रकरणी सावंगी (मेघे) पोलिसांनी गुन्हा दाखल केला. प्रफुल्ल भूजंगराव दाते (वय ५९) रा. पांढरकवडा असे मृताचे नाव आहे. प्रफुल्ल दाते यांनी आर्थिक विवंचनेत मनावर विपरित परिणाम होऊन शेतात विष प्राशन केले. त्यांना उपचाराकरिता रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

### दुकानासमोरून दुचाकी चोरी

**वर्धा :** अज्ञात चोरट्याने दुकानासमोरून दुचाकी चोरून नेली. ही घटना गांधी चौक आर्वी येथे घडली. याप्रकरणी आर्वी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. आर्वी येथील सुमीत राजुरकर यांनी एमएच ३२ एएफ ६४३३ क्रमांकाची दुचाकी दुकानापुढे उभी ठेवली होती. घरी जाण्याकरिता ते दुचाकीजवळ गेले असता त्यांना दुचाकी दिसली नाही. शोध घेऊनही दुचाकी न मिळाल्याने पोलिस ठाण्यात तक्रार करण्यात आली. पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांकडे केंद्र सरकारचे दुर्लक्ष

## ॲड. चटप : दिल्लीतील शेतकरी आंदोलनाच्या समर्थनार्थ चंद्रपुरात धरणे आंदोलन

**लोकशाही वार्ता/नागपूर**

दिल्ली येथे सातत्याने शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे केंद्र सरकार दुर्लक्ष करीत असून तातडीने या सर्व मागण्यांबाबत पंतप्रधान आणि केंद्रीय कृषिमंत्री यांनी निर्णय घ्यावा.

शेतकरी आंदोलकांच्या किमान आधारभूत किमतीसह अन्य मागण्या मंजूर करून त्यांची अंमलबजावणी करावी, या मागणीसाठी शेतकरी संघटना व स्वतंत्र भारत पक्षाच्या वतीने चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन व लाक्षणिक उपोषण करण्यात आले. यावेळी पंतप्रधान व केंद्रीय कृषिमंत्री यांना पाठविण्यासाठी चंद्रपूरचे जिल्हाधिकारी यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

भारतीय किसान युनियनचे पंजाब व हरियाणातील शेतकरी नेते सरदार डल्लेवालजी यांचे केंद्र सरकारने किमान वेतनाचा कायदा करावा, यासाठी उपोषण सुरू आहे. देशभरात सरकारच्या चुकीच्या आयात व निर्यात धोरणांमुळे शेतकरी हवालदिल



झाला आहे. केंद्र व राज्य सरकारांकडे किमान आधारभूत किंमतीने (एमएसपीने) संपूर्ण शेतमाल खरेदी करण्याची व्यवस्था नाही. त्यामुळे नवी पिढी शेतीतून बाहेर निघण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. कोरोना काळात केवळ शेतीनेच शेती क्षेत्राचा जीडीपी (सकल राष्ट्रीय उत्पन्न) कायम ठेवून शेतकऱ्यांनी देश वाचविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. मात्र, तरीही केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत उदासीन आहे.

केंद्राने तत्काळ दिल्ली येथील शेतकऱ्यांच्या मागण्यांची पूर्तता करावी, या मागणीसाठी शेतकरी संघटनेचे माजी प्रांताध्यक्ष माजी आमदार ॲड. वामनराव चटप, शे.सं. जिल्हाप्रमुख अरुण पाटील नवले, स्वभाप जिल्हाध्यक्ष निळकंठ कोरांगे, शालिकराव माऊलीकर, प्रा.सतीश मोहितकर, सुधीर सातपुते, ॲड.दीपक चटप, शेषराव बोंडे, रमेश नळे, रामकृष्ण सांगळे, प्रसाद राव, मिलिंद गड्डमवार, मारोतराव बोथले, प्रसाद राव, मनोज कोपावार, पद्माकर मोहितकर, विकास दिवे, सुभाष रामगीरवार, सचिन बोंडे यांच्यासह शेतकरी संघटना व स्वतंत्र भारत पक्षाच्या जिल्हा पदाधिकाऱ्यांनी धरणे आंदोलन केले.

## निर्माणी कर्मचाऱ्याचा मृतदेह पाण्याच्या टाकीत आढळला

लोकशाही वार्ता/भद्रावती



सकाळी आपल्या कर्तव्यावर गेलेल्या एका निर्माणी कर्मचाऱ्याचा मृतदेह आयुध निर्माणी येथील एका पाण्याच्या टाकीत आढळून आल्याने खळबळ उडाली आहे.

सदर घटना १९ जानेवारी रोजी सायंकाळी सहा वाजता आयुध निर्माणी येथील भवन क्रमांक ७१३ जवळील एका पाण्याच्या टाकीजवळ उघडकीस आली. शेखर शालिकराम रामटेके, वय ५२ वर्ष, राहणार आयुध निर्माणी वसाहत असे मृतक कर्मचाऱ्याचे नाव आहे. घटनेची माहिती प्राप्त झाल्यानंतर भद्रावती पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. घटनेचा पुढील तपास भद्रावती पोलिस करीत आहे.

# नितीन मुसळे गुणवंत शिक्षकेतर कर्मचारी पुरस्काराने सन्मानित

## क्रांतिभूमीत झाला मान्यवरांच्या हस्ते सन्मान

**लोकशाही वार्ता /राजुरा**

५२ व्या राज्यस्तरीय शिक्षकेतर संघटना महामंडळाचे अधिवेशन चंद्रपूर जिल्ह्यातील क्रांतिभूमी चिमूर येथे रविवारी घेण्यात आले. त्यात महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना महामंडळाच्या वतीने प्रतीवर्षी देण्यात येणारा राज्यस्तरीय गुणवंत शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार यंदा नितीन रामचंद्र मुसळे यांना जि. प.चे माजी अध्यक्ष डॉ. सतीश वारजूरकर यांच्या हस्ते देण्यात आला.

यावेळी नागपूर विभागाचे पदवीधर आ. अभिजित वंजारी



शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे सरकार्यवाह शिवाजी खांडेकर, अध्यक्ष अनिल माने, कार्याध्यक्ष मोरेश्वर वासेकर, उपाध्यक्ष रवींद्र गवळी प्रिया पवार, खैरुद्दीन सय्यद, श्रीधर गोंधळी, मुंबई विभागाचे कार्यवाह देविदास पंडागळे, पुणे विभाग डॉ. गोवर्धन पांडुळे, नाशिक विभाग डी.पी महाले, गजानन नानचे संजय कावळे, राजेश्वर चापुले, डॉ. विजय ताले, जीवनदास सार्वे, श्रीकांत पावणे, सुखदेव कंद, भाऊसाहेब थोटे, गोपाळ केडेकर प्रशांत हजारे यांची उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

प्रियदर्शिनी विद्यालय साखरी येथे कार्यरत कनिष्ठ लिपिक नितीन मुसळे मागील अनेक वर्षांपासून शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असून विविध सामाजिक कार्यात त्यांचा सहभाग आहे. सोबतच पत्रकारीतेच्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्रातील समस्यांसह शेतकऱ्यांच्या विविध समस्या मांडण्याचे कार्य त्यांनी केले आहे.

## हनुमान मंदिर निर्मिती भूमिपूजन सोहळा



**लोकशाही वार्ता/भद्रावती**

पवनपुत्र बजरंग बली मंदिर निर्मिती सोहळा गवराळा येथील स्वराजनगर येथे उत्साहात व भक्तीमय वातावरणात पार पडला. मंदिर निर्मितीकरिता सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असणारे ॲड. युवराज धानोरकर यांनी योग्य सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. याप्रसंगी व्यावसायिक निलेश गुंडावार यांचे हस्ते विधिवत पूजनाने भूमिपूजन करण्यात आले. मंदिर निर्मिती ही हनुमान जन्मोत्सवापूर्वी करण्याचा मानस स्वराज नगरी येथील नागरिकांनी व्यक्त केला. सर्व गवराळा वासी व हनुमान मंदिर निर्मिती समितीच्या सदस्यांनी सोहळा संपन्न करण्यास विशेष सहकार्य केले.

### संजय वासेकर यांचे निधन

**लोकशाही वार्ता/भद्रावती**



येथील बगडे वाडीतील रहिवासी संजय नानाजी वासेकर यांचे अल्पशा आजाराने २० जानेवारी रोजी पहाटे ३ वाजता निधन झाले. मृत्युसमयी ते ५७ वर्षांचे होते.त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी व मोठा आप्तपरिवार आहे. शहरातील मोक्षधाम स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आला.

## वेगाने वाहन चालवून मृत्यूस आमंत्रण देऊ नका - जिचकार

**लोकशाही वार्ता/गडचांदूर**

वेगाने वाहन चालवू नका, मृत्यूस आमंत्रण देऊ नका, असा संदेश चंद्रपूर येथील राष्ट्रीय महामार्गाचे प्रकल्प संचालक अभिजीत जिचकार यांनी विद्यार्थ्यांना दिला. जीआर इन्फ्रा प्रोजेक्ट लिमिटेड कॅम्प खिर्डीच्या वतीने गुरुवारी राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताहाच्या निमित्ताने गडचांदूर येथील महात्मा गांधी विद्यालय तथा उच्च माध्यमिक विद्यालयात विविध शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाचे उद्घाटन जीआर इन्फ्रा प्रोजेक्ट्स लिमिटेडचे प्रकल्प अधिकारी कमल कुमार यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून गडचांदूर येथील उपविभागीय पोलिस अधिकारी रवींद्र जाधव, महेंद्रप्रताप पाठक, प्राचार्य साईनाथ मेश्राम, उपप्राचार्य प्रफुल्ल माहुरे, पुनमकुमार अर्जापुरे, रासेयोचे समन्वयक प्रदीप परसुटकर, पर्यावरण सेवा योजनेचे समन्वयक सचिन भैसारे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षेचे महत्त्व, वाहतुकीचे नियम, हेल्मेट आणि सीट बेल्ट वापरण्याचे फायदे यावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमादरम्यान पोस्टरद्वारे वाहतुकीचे नियम समजावून देण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षेची शपथ दिली गेली. यावेळी घोषवाक्य स्पर्धा घेऊन विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरित करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत सकारात्मक संदेश पोहोचला असून, त्यांनी अशा कार्यक्रमांची अधिक आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. आशिष देरकर यांनी केले. तत्पूर्वी शहरभर वाहतूक जनजागृती रॅली काढण्यात आली.

## कुत्र्याच्या हल्ल्यात हरिणीचे पिल्लू ठार

**लोकशाही वार्ता/भद्रावती**



आयुध निर्माणी, चांदाच्या जंगल परिसरातून भटकलेल्या हरिणाच्या पिल्लास पाळीव कुत्र्यांनी हल्ला करून ठार केल्याची घटना रविवार, १९ जानेवारीला पहाटे ५ वाजताच्या सुमारास शहरातील गौतम नगरात उघडकीस आली. या घटनेची माहिती वनविभागाला मिळताच वनरक्षक धनराज गेडाम यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. हरिणीच्या पिल्लास वन विभागाच्या आयुध निर्माणी परिसरातील आरक्षित नर्सरी जवळील जमिनीत पुरण्यात आले. सदरची कारवाई वनपरिक्षेत्र अधिकारी किरण धानकुटे यांच्या नेतृत्वात क्षेत्र सहाय्यक विकास शिंदे, पवन मांढरे, किशोर मडावी, अनिल शेंद्रे यांनी केली.

## खाशाबा जाधव यांचा जन्मदिन राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा

### जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत विविध स्पर्धा व उपक्रमाचे आयोजन

**लोकशाही वार्ता/चंद्रपूर**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने स्व. खाशाबा जाधव राज्य क्रीडा दिनानिमित्त विविध स्पर्धा व उपक्रमाचे आयोजन जिल्हा क्रीडा संकुल, चंद्रपूर येथे करण्यात आले होते. यावेळी खाशाबा जाधव यांच्या जयंतीनिमित्त चंद्रपूर शहरात खेळाडूंची भव्य रॅली काढण्यात आली.

तालुका क्रीडा अधिकारी जयश्री देवकर व बार्टीच्या संचालिका अलका मोटघरे यांनी हिरवी झेंडी दाखवून रॅलीचा शुभारंभ केला. जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड यांनी रॅलीतील उपस्थित खेळाडूंना संबोधित केले. यावेळी व्हॉलीबॉल, बॉक्सिंग, ॲथलेटिक्स, स्केटिंग, कुस्ती, रस्सीखेच, बॅडमिंटन, बास्केटबॉल, कबड्डी, खो-खो आणि जलतरण यासारख्या विविध खेळांमध्ये खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये, क्रीडा मंडळामध्ये विविध उपक्रमाद्वारे राज्य क्रीडा दिन जल्लोषात साजरा करण्यात आला. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडून विविध क्रीडा स्थळांना भेटी देण्यात आल्या. यावेळी उत्कृष्ट खेळाडूंशी ऑनलाईन संवाद देखील साधण्यात आला. त्यासोबतच खाशाबा जाधव यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारा विशेष कार्यक्रम, परिसंवाद, चर्चासत्र व व्याख्यानाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी आहारतज्ज्ञ लीना यांनी संतुलित आहाराबद्दल मार्गदर्शन केले. क्रीडा संस्कृती लोकांमध्ये रुजविण्यासाठी तसेच जिल्ह्यामध्ये भौतिक सुविधा उपलब्ध करण्यासाठी क्रीडा विभागाकडून प्रयत्न केले जात आहे, असे जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी खेळाडूंना सांगितले. तसेच तालुका क्रीडा अधिकारी जयश्री देवकर यांनी 'खेलेंगे तो खिलेंगे' हा मंत्र दिला. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये पदक प्राप्त, व्हॉलीबॉल खेळाडू, तसेच महाराष्ट्राचे प्रतिनिधी मॅनेजर म्हणून लखनऊ येथे राष्ट्रीय वयोगट १७ करिता गेलेले रामू नागपुरे यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा अधिकारी मनोज पंधराम यांनी केले. संचालन क्रीडा अधिकारी मोरेश्वर गायकवाड तर आभार क्रीडा मार्गदर्शक संदीप उईके यांनी मानले.

# पंचशिलाचे पालन केल्याने खऱ्या जीवनाचा आनंद मिळेल - घोणमोडे

## समाज सेवक पुरस्काराचे वितरण

**लोकशाही वार्ता/चिमूर**

बौद्ध धम्म हा विज्ञानावर आधारित असून प्रत्यक्ष कृतीने आपल्या जीवनात परिवर्तन आले आहे. प्रत्येक नागरिकांनी पंचशिलाचे पालन केल्यास खऱ्या जीवनाचा आनंद उपभोगता येईल, असे मार्गदर्शन सेवानिवृत्त माजी शिक्षण सहसंचालक शिशीर घोनमोडे यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्माचा प्रचार व प्रसार करून स्थापन केलेल्या भारतीय बौद्ध महासभा तालुका चिमूरतर्फे शनिवार, १८ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता लुंबिनी बुद्ध विहार वडाळा पैकु येथे कार्यकर्ता मेळावा व चर्चासत्राचे आयोजन केले होते. याप्रसंगी घोनमोडे बोलत होते. यावेळेस कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा अध्यक्ष लहुजी पाटील, उद्घाटक चंद्रपूर जिल्हा (पूर्व) अध्यक्ष डॉ. राजपाल खोब्रागडे, मुख्य मार्गदर्शक केंद्रीय शिक्षक तुलाराम राऊत, जिल्हा सरचिटणिस लोमेश खोब्रागडे, जिल्हा संघटक जनार्धन खोब्रागडे , इंजी. पदमाकर नारनवरे, प्रा गौतम डांगे, जिल्हा संघटक सोनाली गजभिये, जी.एम. बाम्बोडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. यानिमित्ताचे चिमूर तालुक्यात



बौद्ध धम्माचे प्रचार प्रसार तसेच सामाजिक तथा विविध कार्यात महत्त्वाचे योगदान असणाऱ्यांचा समाज सेवक पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला.यात पत्रकार जितेंद्र सहारे, मुख्याध्यापक रामदास कामडी, सेवानिवृत्त शिक्षक बद्रीनाथ देसाई, उद्धव मोहोड, उद्धव खाडे, पठाण सर यांच्यासह अनेकांचा समावेश होता. याप्रसंगी भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष म्हणून शिवराम मेश्राम तर महिला विभाग अध्यक्ष म्हणून ॲड. संजीवनी सातारडे यांची निवड करण्यात आली. प्रास्ताविक शिवराम मेश्राम, संचालन नत्थुजी रामटेके तर आभार पितांबर खोब्रागडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी भारतिय बौद्ध महासभा तालुका, शहर व ग्राम शाखेच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी योगदान दिले.

# बांबू कारागिरांना अम्माच्या नावाने कौशल्य पारितोषिक पुरस्कार देणार

**लोकशाही वार्ता/चंद्रपूर**

आजचा हा कार्यक्रम बुरुड कारागिरांच्या प्रगतीसाठी आणि त्यांच्या कौशल्याला चालना देण्यासाठी महत्त्वाचा आहे. आपल्या परंपरागत व्यवसायाला आधुनिकतेची जोड देत नव्या उंचीवर नेण्यासाठी हा टूल किट वाटप उपक्रम राबवला जात आहे. या कारागिरांना प्रोत्साहन देण्यासाठी पुढल्या वर्षी पासून आपण पुढाकार घेणार असून 'अम्मा'च्या नावाने बांबू कारागिरांना कौशल्य पारितोषिक देणार असल्याची घोषणा आमदार किशोर जोरगेवार यांनी केली

बांबू प्रशिक्षण केंद्राच्या वतीने वन अकादमी येथे बुरूड समाजातील बांबू कारागिरांना टूल किट वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आ. किशोर जोरगेवार बोलत होते. या कार्यक्रमाला वन अकादमीचे अप्पर प्रधान मुख्य वनरक्षक एम.एस रेड्डी, बांबू प्रशिक्षण केंद्राचे संचालक अशोक खडसे, भाजप नेते प्रकाश देवतळे आदी मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती. यावेळी बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, आज माझ्या हस्ते टूल किट देण्यात आली. त्यामुळे आपला पारंपरिक व्यवसाय टिकविण्यासाठी एका बुरूड समाजाच्या व्यक्तीने समाजाच्या दुसऱ्या व्यक्तीला शस्त्र दिल्याचा अधिक आनंद होत आहे. या प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून कारागिरांच्या हाताला कौशल्य देण्याचे काम आपल्या वतीने केल्या जात आहे. बांबू हे रोजगार देणारे साधन आहे. वन विभागानेही अशा कारागिरांना आवश्यक असलेला बांबू उपलब्ध करून दिला पाहिजे. बांबू प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून आता प्रत्येक वॉर्डात प्रशिक्षण शिबिरे सुरू केले पाहिजेत. यात लागणारी मदत करण्याची आमची पूर्ण तयारी असल्याचे ते यावेळी म्हणाले. नवे कौशल्य आत्मसात करत आपल्यातील कला दुसऱ्यापर्यंत पोहचविण्याचे आवाहन यावेळी बोलताना त्यांनी केले. या कार्यक्रमात आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते बुरूड कारागिरांना टूल किटचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाला कारागिरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# जिल्ह्यातील पाच आमदारांपैकी एकाला पालकमंत्री पद द्यावे

## अन्यथा २६ जानेवारीपासून बेमुदत आंदोलन करणार - पाईकराव

**लोकशाही वार्ता/चंद्रपूर**

चंद्रपूर जिल्ह्यातील स्थानिक रहिवासी महायुतीतील सरकारमधील पाच आमदारांपैकी एकाला मंत्री तथा राज्यमंत्रीपदी नियुक्ती करून पालकमंत्री पद देण्यात यावे, जर या पाच आमदारांना जमत नसेल तर काँग्रेसच्या आमदाराला पालकमंत्री पद द्यावे, अशा मागणीचे निवेदन सफेद झंडा कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश मल्हारी पाईकराव यांनी २० जानेवारी रोजी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत महाराष्ट्र राज्यपालांना दिले आहे. मागणी पूर्ण न झाल्यास २६ जानेवारीपासून बेमुदत आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

जिल्ह्यात महायुतीचे पाच आमदार निवडून आले असूनसुद्धा चंद्रपूर जिल्ह्याला एकसुद्धा मंत्री पद दिले नाही. बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातून मुनगंटीवार हे सातव्यांदा विधानसभा निवडून जिंकले. चंद्रपूर क्षेत्रातून किशोर जोरगेवार हे दुस?यांदा निवडून आले. चिमूर विधानसभा क्षेत्रातून बंटी बागडिया तिसऱ्यांदा निवडून आले. राजुरा क्षेत्रातून देवराव भोंगळे निवडून आले.

वरोरा क्षेत्रातून करण संजय देवतळे निवडून आले. असे सहा विधानसभामधून पाच विधानसभेमध्ये महायुतीतील बीजेपीने निवडणुकीत आपला डंका वाजवून विजयीपथ हाती घेतले. हे आमदार जिल्ह्यातील रहिवासी असून, या पाचमधून आम्हाला स्थानिक पातळीवरचा पालकमंत्री



न देता यवतमाळ जिल्ह्यातील रहिवासी पालकमंत्री देण्यात आला आहे. हा आमच्या चंद्रपूर जिल्ह्यावर अन्याय आहे, असे सुरेश मल्हारी पाईकराव यांनी सांगितले.

चंद्रपूर जिल्ह्यात अनेक खदानी, स्टिल प्लॉट, सिमेंट कारखाने असूनसुद्धा आमच्या स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार नाही, परप्रांतीय लोकांना इथे रोजगार मिळतो. स्थानिक भूमिपुत्रांना नाहीच्या बरोबर रोजगार आहे. चंद्रपूरवासीयांनी महायुतीवर विश्वास ठेवून निवडून दिले आणि महायुतीने चंद्रपूर जिल्ह्यावर इतका मोठा अन्याय केला.

या पाच आमदारांमधून एकाला पालकमंत्री पद देण्यात यावे. तसेच एका आमदाराला मंत्री तथा राज्यमंत्री पद देऊन जिल्ह्याला न्याय देण्यात यावा अन्यथा २६ जानेवारी रोजी तीव्र भूमिका घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करणार असा इशारा देण्यात आला. यावेळेस सुरेश मल्हारी पाईकराव, राकेश कातकर, अशोक भगत, शरद पाईकराव, जगदीश मारबते, दत्ता वाघमारे, राकेश पराशिवे, बबन वाघमारे आदी उपस्थित होते.


## पिंपळगाव येथे घरफोडी

**भंडारा :** घरात कुणीच नसल्याची संधी साधून अज्ञात चोरांनी घरफोडी करून ६२ हजारांचा ऐवज चोरून नेला. ही घटना १९ जानेवारीच्या रात्री पिंपळगाव सडक येथे घडली. फिर्यादी विजेंद्र रामदास बोरकर हे बाहेर असताना अज्ञात चोराने घराचा कुलूप तोडून लोखंडी आलमारीत ठेवलेला ७५ ग्रॅम वजनाचा सोन्याचा गोप, ५ ग्राम वजनाची सोन्याची अंगठी, ३ ग्रॅम वजनाची सोन्याची नथ असा एकूण ६२ हजाराचा ऐवज चोरून नेला. फिर्यादीच्या तक्रारीवरून लाखनी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.अधिक तपास सुरू आहे.




लोकशाही वार्ता
# भंडारा
नागपूर, मंगळवार, २१ जानेवारी २०२५/१०

## उपचारादरम्यान मृत्यू



**भंडारा :** विष प्राशन केल्याने उपचारासाठी भरती इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. उत्तम चुडामन ठवकर (४१) रा. मानेगाव बाजार असे मृतकाचे नाव आहे. उत्तम ठवकर याने स्वतःच्या घरी विषारी औषध प्राशन केले होते. त्याला उपचारासाठी भंडारा येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. कारधा पोलिसांनी मर्ग नोंद केला आहे.

epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta

## दृष्टिक्षेप

### तीन तालुक्यांत हत्तीरोगाचा धोका

**भंडारा :** भंडारा जिल्ह्यातील लाखनी, मोहाडी, तुमसर या तीन तालुक्यात सध्या हत्तीरोगाबाबत धोका वाढलेला आहे. या तालुक्यांमध्ये हतीरोगाच्या दुरीकरणासाठी राष्ट्रीय कीटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत हत्तीरोग सामुदायिक औषधोपचार मोहीम दि. १० फेब्रुवारीपासून राबविण्यात येणार आहे. सदर मोहीम प्रभावीपणे राबविण्यासाठी जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यशाळा जिल्हा परिषद सभागृहात गुरूवारी (दि.१६) रोजी घेण्यात आली. या कार्यशाळेला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मिलिंद सोमकुवर, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन चव्हाण, जागतिक आरोग्य संघटना सल्लागार डॉ. समाधान देबाजे, जिल्हा हिवताप तथा हत्तीरोग अधिकारी डॉ. कैकाडे, पीसीआय प्रतिनिधी पावसे यांनी मार्गदर्शन केले. जिल्हा प्रशिक्षणात लाखनी, मोहाडी व तुमसर तालुक्यातील तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य निरीक्षक उपस्थित होते.

### हत्तीरोग निर्मूलन व आरोग्यविषयक मार्गदर्शन

**पालांदूर (चौ ):** स्थानिक श्री संताजी कला व विज्ञान महाविद्यालय पालांदूर येथे हत्तीरोग निर्मूलनासाठी जाणीव जागृती करण्याच्या हेतूने आरोग्य विषयक मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी अध्यक्ष म्हणून डॉ. गिरीश लांजेवार तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून वैद्यकीय समुपदेशक स्वाती कडूकार, डॉ. राजेंद्र खंडाईत, डॉ. रमेश बागडे, डॉ.रवी पाठेकर, प्रा. नितीन थुल, प्रा. प्रमोद शेंडे, जया कोडापे तसेच महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी उपस्थित होते. हत्तीरोगाला आळा घालण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना करण्यात याव्यात याची जाणीव आरोग्य विषयक मार्गदर्शनातून करण्यात आली.

### तुकाराम महाराज जयंती उत्सव व महिला मेळावा

**लाखनी :** संत तुकाराम बहुद्देशीय सेवाभावी संस्था लाखनीच्या वतीने संत तुकाराम महाराज जयंती उत्सव व महिला मेळावाचे आयोजन २१ जानेवारी रोजी दुपारी ३.३० वा संत तुकाराम सभागृह (केसलवाडा फाटा) येथे करण्यात आले आहे. अध्यक्षस्थानी जयकृष्ण फेंडरकर, प्रमुख वक्ते प्रा. छत्रपाल लामकाने प्रमुख अतिथी महिला व बाल कल्याण सभापती स्वाती वाघाये, सभापती प्रणाली सार्वे, जि. प. सदस्य डॉ. मनिषा निंबार्ते, प. स. सदस्य मनिषा हलमारे, गडेगावच्या सरपंच वर्षा रेहपाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. उपस्थित राहण्याचे आवाहन संत तुकाराम बहुद्देशीय सेवाभावी संस्था, कुणबी महिला समिती आणि युवा समितीने केले आहे.

# पंचायत समितीत महायुतीचा झेंडा

## सातपैकी ४ पंचायत समितीवर महायुती: काँग्रेसकडे तीन


भंडारा


लाखांदूर


तुमसर


तुमसर


लाखनी


साकोली

### पवनीत काँग्रेसचा सभापती, उपसभापतिपद भाजपकडे





**पवनी :** पवनी पंचायत समितीच्या सभापतीपदी काँग्रेसचे विठ्ठल नारनवरे यांची अविरोध निवड झाली तर उपसभापती पदाची निवडणूक चुरशीची होऊन दोन्ही उमेदवारांना समान मते मिळाल्याने ईश्वरचिठ्ठी काढून भाजपचे प्रमोद मेंढे हे विजयी झाले. उपसभापती पदाकरिता तीन उमेदवारांनी आपली उमेदवारी जाहीर केली. यात भाजपचे एकमेव सदस्य प्रमोद मेंढे, शिवसेनेचे महेश भुरे तर बीएसपीच्या सुवर्णा रामटेके यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. उमेदवारी अर्ज परतीच्या वेळी महेश भुरे यांनी आपली उमेदवारी मागे घेत उपसभापतीच्या निवडणूक चुरस निर्माण केली. यात दोन्ही उमेदवारांना ७-७ अशी समान मते मिळाल्याने ईश्वरचिठ्ठी काढण्यात आली. यात प्रमोद मेंढे यांना उपसभापतीची लॉटरी लागली. निवडणूक अधिकारी तथा पीठासीन अधिकारी म्हणून निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपात्रे यांनी काम पाहिले. नायब तहसीलदार (निवडनुक) सुभदा धुर्वे, खंड विकास अधिकारी दीपक गरूड यांनी निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी मदत केली.

**लोकशाही वार्ता / भंडारा**

जिल्ह्यातील सात पंचायत समित्यांच्या सभापती आणि उपसभापतीपदांच्या निवडणुकीत पुन्हा एकदा महायुतीने झेंडा फडकविला आहे. सातपैकी चार पंचायत समितींवर महायुती तर तीन ठिकाणी काँग्रेसचे उमेदवार निवडून आले आहेत.

भंडारा पंचायत समितीत सभापती म्हणून भाजपच्या कल्पना कुर्झेकर तर उपसभापती म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे नागेश भगत निवडून आले. लाखांदूर पंचायत समितीच्या सभापती म्हणून भाजपाचे पुरुषोत्तम बक्षी ठाकरे यांची तर उपसभापतीपदी राष्ट्रवादी काँग्रेसच्या संजना संजय वरखडे यांची निवड झाली. साकोली पंचायत समिती सभापतिपदी काँग्रेसचे ललित हेमने आणि उपसभापतीपदी काँग्रेसच्या करुणा वालोदे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. लाखनी पंचायत समिती सभापती म्हणून काँग्रेस पक्षाच्या अश्विनी मोहतुरे यांची अविरोध निवड झाली. तर उपसभापतीपदावर काँग्रेसचे सुनिल बांते निवडून आले. मोहाडी पंचायत समितीच्या सभापतीपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे जगदीश शेंडे यांची तर उपसभापती म्हणून रेवानंद चकोले यांची निवड झाली. तुमसर पंचायत समितीच्या उपसभापतीपदाच्या निवडणुकीत भाजपचे सुभाष बोरकर हे अविरोध निवडून आले. सभापती म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसच्या दीपिका गौपाले या १३ विरुद्ध ७ मतांनी निवडून आले. तर पवनी पंचायत समितीच्या सभापतीपदी काँग्रेसचे विठ्ठल नारनवरे हे अविरोध निवडून आले. तर उपसभापतीपदी ईश्वरचिठ्ठी काढून भाजपचे प्रमोद मेंढे हे निवडून आले.

### भंडाऱ्यात महायुतीचे वर्चस्व

**भंडारा:** २० सदस्यसंख्या असलेल्या भंडारा पंचायत समितीच्या सभापती, उपसभापतीच्या निवडणुकीत महायुतीचे वर्चस्व राहिले. सभापतीपदी भाजपच्या कल्पना कुर्झेकर तर उपसभापतीपदी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) चे नागेश भगत यांची अविरोध निवड करण्यात आली. काँग्रेसच्या उमेदवारांनी दोन्ही पदांसाठी अर्ज दाखल केले होते. परंतु, ऐनवेळी दोन्ही उमेदवारांनी निवडणुकीतून माघार घेतल्याने ही निवडणूक अविरोध झाली. भंडारा पंचायत समितीत भाजपकडे ७, राष्ट्रवादी काँग्रेसकडे ६, शिवसेना १, काँग्रेस ४ आणि अपक्ष २ असे पक्षीय संख्याबळ आहे.

### लाखांदुरात भाजपचा झेंडा

**लाखांदूर :** लाखांदूर पंचायत समितीच्या सभापती, उपसभापती पदासाठी घेण्यात आलेल्या विशेष सभेमध्ये भाजपाचे पुरुषोत्तम बक्षी ठाकरे यांची सभापती म्हणून निवड करण्यात आली तर उपसभापतीपदी राष्ट्रवादी काँग्रेसच्या संजना संजय वरखडे यांची भाजप समर्थनात निवड करण्यात आल्याने लाखांदूर पंचायत समितीवर भारतीय जनता पार्टीचा झेंडा फडकला.

पंचायत समिती सभागृहात सभापती व उपसभापती निवडीसाठी विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला निवडणूक निर्णय अधिकारी तथा पिठासीन अधिकारी म्हणून लाखांदूरचे तहसीलदार वैभव पवार प्रामुख्याने उपस्थित होते. विशेष सभेत काँग्रेसकडून मंगेश राऊत तर भाजपाकडून पुरुषोत्तम ठाकरे यांनी नामनिर्देशन अर्ज भरले होते. हात उंचावून घेण्यात आलेल्या मतदान प्रक्रियेत पुरुषोत्तम ठाकरे यांना ७ मते पडली तर मंगेश राऊत यांना ४ मते पडली. सभापती म्हणून पुरुषोत्तम ठाकरे यांची निवड झाली.

उपसभापती पदासाठी सभागृहात उपस्थित ११ सदस्यांमधून काँग्रेस गटाअंतर्गत अमृता निलेश ठाकरे यांनी अर्ज दाखल केला होता तर भाजपा समर्थनात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांतर्गत संजना संजय वरखडे यांनी अर्ज दाखल केला होता. उपस्थित सदस्यांच्या संमतीने उपसभापती पदासाठी दाखल २ भिन्न उमेदवारांना हात उंचावून मतदान घेण्यात आले. यावेळी काँग्रेस गटाअंतर्गत अमृता ठाकरे यांना ५ मते पडली तर भाजपा समर्थनात राष्ट्रवादी काँग्रेसच्या संजना वरखडे यांना ६ मते पडल्याने त्यांची उपसभापती म्हणून घोषणा करण्यात आली. या निवडणूक प्रक्रिया दरम्यान लाखांदूरचे तहसीलदार वैभव पवार, पंचायत समितीचे बिडिओ मार्तंड खुणे, विस्तार अधिकारी पंकज डुंभरे आदींनी कामकाज पार पाडले.

**एक सदस्य गैरहजर**

लाखांदूर पंचायत समितीमध्ये १२ सदस्य निवडून आले होते. त्यापैकी सभापती व उपसभापती निवडीच्या झालेल्या विशेष सभेत १२ पैकी केवळ ११ सदस्यच उपस्थित होते. गैरहजर असलेले महिला सदस्य निमा ठाकरे हे यापूर्वी पंचायत समितीचे उपसभापती होते. विशेष म्हणजे यापूर्वी पंचायत समितीचे सभापती असलेले संजना वरकडे यांची आता उपसभापती म्हणून निवड झाली आहे. एकंदरीतच यापूर्वी पंचायत समितीच्या उपसभापती असलेल्या महिला सदस्य कोणत्या कारणामुळे विशेष सभेला गैरहजर होत्या, याची चर्चा संपूर्ण तालुक्यात केली जात आहे.

### साकोलीत बिनविरोध निवड

**साकोली:** पंचायत समिती सभापतीपदी ललित हेमने आणि उपसभापतीपदी करुणा वालोदे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडणुकीत काँग्रेसच्या ८ सदस्यांनी व ३ अपक्ष सदस्यांनी सभापती व उपसभापती यांच्या निवडीसाठी मतदान केले. निवडणूक निर्णय अधिकारी निलेश कदम आणि गटविकास अधिकारी जाधव यांच्या उपस्थितीत पार पडली. निवडणूक प्रक्रियेदरम्यान काँग्रेसचे पंचायत समिती सदस्य होमराज कापगते गैरहजर असल्याचे दिसून आले.

### लाखनीत काँग्रेसचे वर्चस्व

**लाखनी:** पंचायत समिती लाखनीच्या सभापती व उपसभापती पदाच्या झालेल्या निवडणुकीत कनेरी/दगडी पंचायत समिती गणातून निवडून आलेल्या काँग्रेस पक्षाच्या अश्विनी मोहतुरे यांची सभापतीपदी अविरोध निवड झाली. आरक्षण सोडतीत लाखनी पंचायत समिती सभापतीपद हे अनुसूचित जाती महिलेकरिता आरक्षित निघाले होते.

कनेरी/दगडी पंचायत समिती गणातून निवडून आलेल्या अश्विनी कान्हेकर या अनुसूचित जाती महिला प्रवर्गातून एकमेव सदस्य असल्याने त्यांची अविरोध सभापतीपदी वर्णी लागली. मात्र, उपसभापती पदासाठी चांगलीच रस्सीखेच झाली.

उपसभापती पदासाठी एकुण चार उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले होते. सुरेश झंझाड यांचा अर्ज छाननीत रद्द झाला. अपक्ष पंचायत समिती सदस्य दादू खोब्रागडे यांनी अर्ज मागे घेतला. शेवटी काँग्रेसकडून सुनिल बांते तर भाजपकडून शारदा मुकेश मते यांचे उमेदवारी अर्ज कायम राहिले. मतदानाद्वारे सुनिल बांते यांना सहा मते मिळाली, भाजपाच्या शारदा मते यांना ५ मते मिळाली तर एक पंचायत समिती सदस्य तटस्थ राहिले. त्यामुळे बहुमताने उपसभापतीपदी काँग्रेसचे सुनिल बांते यांची निवड झाली.

निवडणुक निर्णय अधिकारी म्हणुन उपविभागीय महसूल अधिकारी अश्विनी मांजे यांनी काम पाहिले.

### बीआरएसकडून आलेले सभापती व उपसभापती

**मोहाडी :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने (अजित पवार गट) भारत राष्ट्रीय समिती गटाला फोडण्यात यश आले. त्यामुळे राष्ट्रवादी गटाकडे आलेले बीआरएस गटाचे दोन्ही पंचायत समिती सदस्य सभापती व उपसभापती पदावर निवडून आले. काही महिन्यापूर्वी बीआरएस गटातील व भाजपाकडून निवडून आलेले जगदीश शेंडे आणि चरण वाघमारे यांच्यात प्रचंड आरोप प्रत्यारोप झाले. अखेर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात (अजित पवार गट) प्रवेश घेतला. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बळ सहावरून सात झाले.

मोहाडी पंचायत समितीच्या एकूण १४ सदस्यांपैकी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व बीआरएस गटाकडे ७ - ७ असे सारखे संख्याबळ होते. बहुमतासाठी दोन्ही गटाला एका सदस्याची आवश्यकता होती. सभापती उपसभापती निवडणुकीच्या तोंडावर भाजपाच्या चिन्हावर निवडून आलेले व बीआरएस गटाचे पंचायत समिती रेवानंद चकोले यांना आमदार राजू कारेमोरे यांनी आपल्याकडे वळवले. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे (अजित पवार गट) पंचायत समिती सदस्य ८ संख्या झाली. त्यानंतर सर्व सदस्य एका आठवड्यापूर्वी सहलीसाठी बाहेर पडले होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे आलेले पंचायत समिती सदस्य जगदीश शेंडे व सभापती निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादी पक्षाच्या गटात सामील झालेले रेवानंद चकोले यांना सभापती व उपसभापती पदावर विराजमान करण्यात आमदार राजू कारेमोरे यांना यश आले.

### तुमसरात महायुतीचे वर्चस्व

**तुमसर:** पंचायत समितीच्या उपसभापतीपदाच्या निवडणुकीत भाजपचे सुभाष बोरकर हे अविरोध निवडून आले. सभापती म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसच्या दीपिका गौपाले या १३ विरुद्ध ७ मतांनी निवडून आले. सदर निवडणूक प्रक्रियेत उपविभागीय अधिकारी दर्शन निकाळजे, गटविकास अधिकारी नंदकुमार वाडेकर, नायब तहसीलदार भुमेश्वर पेंदाम व संजय जांभुळकर यांच्या उपस्थितीत निवडणूक पार पडली. तुमसर पंचायत समितीत पुन्हा महायुतीने बाजी मारली.

# जिल्हास्तरीय नगरपरिषद क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम

**लोकशाही वार्ता / भंडारा**



जिल्हास्तरीय नगर परिषद/ नगर पंचायत क्रीडा स्पर्धा व सांस्कतिक कार्यक्रम २०२४-२०२५ चे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. याप्रसंगी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले.

सांस्कृतिक कार्यक्रमात गोंडी नृत्य सादर करण्यात आले. या नृत्यात मनिषा खंडारे, दिक्षा सिंगाडे, सायुरी तिरपुडे, प्रतिक्षा फुंडे, किशोर नेवारे, भुवन राऊत, संजय सव्वालाखे, उके, सोनु शहारे, आनंद मिश्रा यांनी भाग घेतला.

गोंडी नृत्य यशस्वीतेकरिता मुख्याधिकारी करणकुमार चव्हाण यांनी आवश्यक सहकार्य केले तसेच नृत्याची स्तुती करत बक्षीस सुद्धा देण्यात आले.

# विहिरीत आढळले बिबट आणि दोन कुत्र्यांचे मृतदेह

## केसलवाडा परिसरातील घटना



**लोकशाही वार्ता / अड्याळ**

अड्याळ वनपरिक्षेत्रात येणाऱ्या केसलवाडा गावातील प्रतीक रामटेके यांच्या शेतात एक बिबट आणि दोन कुत्र्यांचे मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळले. ही घटना उघडकीस आल्यानंतर, अड्याळ वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना घटनेची माहिती देण्यात आली. वन विभागाचे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी पोहोचले आणि तपास सुरू केला. सर्व मृत प्राण्यांचे अवयव शाबूत आढळले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, केसलवाडा येथील प्रतीक रामटेके यांच्या शेतात एका बिबट आणि दोन कुत्र्यांचा गूढ मृत्यू झाला. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मते, या सर्व प्राण्यांचा मृत्यू सुमारे चार दिवसांपूर्वी झाला असावा असा अंदाज आहे. घटनेची माहिती मिळताच उपवनसंरक्षक राहुल गवई, सहाय्यक वनसंरक्षक सचिन निलख घटनास्थळी पोहोचले. अड्याळ वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या पथकाने विहिरीतून सर्व मृतदेह बाहेर काढले. सध्या नेरला उपसा सिंचन प्रकल्पातून शेतकऱ्यांच्या पिकांसाठी पाणी सोडण्यात आले आहे. भक्ष्याच्या शोधात भटकत असताना बिबट विहिरीत पडला असल्याचा संशय आहे. बिबट्याचे सर्व अवयव शाबूत आढळले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मृतदेहांचे शवविच्छेदन केले. अड्याळ वनक्षेत्रात वन्यजीवांच्या वाढत्या हालचालींमुळे शेतकरी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरू लागले आहे.

# वाढत्या अतिक्रमणाविरोधात नगरपरिषदेवर जनाक्रोश मोर्चा

**लोकशाही वार्ता/तुमसर**

तुमसर शहरात वाढत्या अतिक्रमणामुळे व शहरातून होत असलेल्या जड वाहतुकीमुळे दिवसेंदिवस अपघात घडत आहेत. नुकतेच बसस्थानकासमोर कौशल्या दहाट या महिलेला आपले प्राण गमवावे लागले. या घटनेच्या दोन दिवसानंतर स्मार्ट बाजार समोर भरधाव वेगाने आलेल्या रेतीच्या टिप्परने दुचाकीला धडक दिल्याने एका महिलेचा हात निकामी झाला. या प्रकाराला वेळीच आळा बसावा यासाठी सर्वपक्षीय जनाक्रोश मोर्चा नगर परिषदेवर काढण्यात आला.

यावेळी नगरपालिका मुख्य प्रवेशद्वारासमोर सर्वपक्षीय आंदोलन करण्यात आले. तहसीलदार मोहन टिकले, पोलिस निरीक्षक संजय गायकवाड व नगरपालिकेचे मुख्याधिकारी जुम्मा प्यारेलाले यांनी आंदोलनकर्त्यांना भेट दिली असता त्यांना आंदोलनकर्त्याकडून अपघातासंदर्भात जाब विचारला गेला. यात शहरातील योग्य



उपाययोजना करण्याचे मागणी करण्यात आली. शहरात जड वाहनांची वाहतूक, यांची गती मयार्दा कमी करण्यात यावे, शहरातील मुख्य रस्त्यावर बॅरिकेट करण्यात यावे, अवैध रेती वाहतूक व अदानी राखेचा वाहतूक करण्याचा निर्धारित वेळ निश्चित करावे. नगरपालिका मुख्याधिकारी यांनी गावातील रस्ते अतिक्रमणे मोकळे करावे. शाळेतील विद्यार्थ्यांना मुख्य रस्त्यावरून जाताना वाहतूक पोलिसांनी उपस्थित राहावे. प्रवासी वाहतूक वाहने व बसस्टॉप समोरील वाहनांच्याही गती मर्यादा निश्चित करण्यात यावी. १०, १२ आणि २० चक्के अवजड वाहने शहरात प्रवेश निषेध करावे. बायपास रस्ता मेहगाव रोड ते खापा रोड रस्ता तात्काळ बनविण्यात यावा. खापा- रामटेक रोड वरील हसारा मार्गे कटंगी रोडला वाहतूक सुरू करावे तसेच शहरातील मुख्य मार्गावरील खड्डेमय रस्त्यांची कामे तातडीने पूर्ण करावे, या सर्व मागण्या ताबडतोब पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी प्रशासनाने वरील सर्व मागण्या मान्य केले असून यावर अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले आहे. त्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले. यादरम्यान आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेऊन नंतर सोडण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष अभिषेक कारेमोरे, अमर रगडे, अमित मेश्राम, सुरज भुरे, मिना गाढवे, वंदना आकरे, करुणा घुर्वे, नेहा मोटघरे, विजया चोपकर, माजी नगरसेवक बाळा ठाकूर, मेहताबसिंग ठाकूर, राजू गायधने, सलाम तुरक, कॉंग्रेसचे जितेंद्र बावनकर, प्रमोद कटरे, शैलेश पडोळे, निशिकांत पेठे, राजेश देशमुख, संदीप पेठे, अतुल कारेमोरे, गौरव नवरखेले, हेमंत मलेवार, विक्रम फुलवधवा, सुनील थोटे, पवन किरपाणे, दीपक लुटे, अमित लांजेवार, आलोक बन्सोड, अजय सहारे, राजेश अग्रवाल, अमर माधवानी, बंडू शर्मा, विक्रम लांजेवार, तिलक गजभिये, तोशल बुरुडे, प्रतिक निखाडे यासह मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती.

### हॉटेलची तोडफोड करून एक लाखाचे नुकसान

**भंडारा :** जेवणाचे पैसे मागितले असता हॉटेलची तोडफोड केल्याची घटना राष्ट्रीय महामार्गावरील हॉटेलात घडली. फिर्यादी गजानन पतीराम कुरंजेकर (४५) रा. संत कबीर वॉर्ड भंडारा यांचे राष्ट्रीय महामार्गावर हॉटेल आहे. त्यांच्या हॉटेलमध्ये दि. १८ जानेवारी रोजी रात्री कुणाल रंगारी (२५) व तीन ते चार अनोळखी तरुण जेवणासाठी आले. जेवण झाल्यानंतर बिल मागण्यासाठी गेले असता आरोपींनी गजानन कुरंजेकर यांच्यासोबत भांडण करून मारहाण केली. फिर्यादीने त्यांना हॉटेलच्या बाहेर काढले तेव्हा आरोपी कुणाल रंगारी व त्यांच्या मित्रांनी हॉटेलमध्ये प्रवेश करून हॉटेलच्या सामानाची तोडफोड केली. यात हॉटेलच्या साहित्याच्या १ लाखाचे नुकसान झाले. तक्रारीरून भंडारा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

लोकशाही वार्ता

# गोंदिया

नागपूर, मंगळवार, २१ जानेवारी २०२५/११

लोकशाही वार्ता
जिल्हा कार्यालय, गोंदिया
जिल्हा प्रतिनिधी : जयंत शुक्ला
पत्ता : दुसरा माळा, गौरक्षण मार्केट गोंदिया
संपर्क क्र ९८२२३८६९९९

epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta


## रेल्वे गाड्यांचे वेळापत्रक बिघडले

**गोंदिया :** गेल्या चार पाच दिवसांपासून हावडा-मुंबई मार्गावरील रेल्वे गाड्यांचे वेळापत्रक मालगाड्यांना प्रथम प्राधान्य धोरणामुळे बिघडले आहे. अमृतसर छत्तीसगड, समता, मुंबई एलटीटी, हावडा-अहमदाबाद, गोंडवाना एक्स्प्रेस या गाड्या तब्बल चार ते पाच तास उशिराने धावत आहे. या प्रकारामुळे प्रवासी त्रस्त झाली आहे. हावडा-मुंबई मार्गावरील रेल्वे गाड्यांचे वेळापत्रक गेल्या तीन महिन्यांपासून सुरळीत झाले होते. पण रेल्वे विभागाने गेल्या आठवड्यापासून प्रवासी गाड्यांऐवजी पुन्हा मालगाड्यांना प्राधान्य देण्याचे धोरण अवलंबिले आहे. यामुळे प्रवाशांना कोंडीचा सामना करावा लागत आहे.




## दृष्टिक्षेप

### दर शनिवारला होणार तक्रारीचे निवारण

**गोंदिया :** गोंदिया जिल्हयातील सर्व १६ पोलिस ठाणे स्तरावर पोलीस ठाण्यास प्रलंबित असलेल्या जनतेच्या तक्रारीच्या निराकरणाच्या अनुषंगाने तक्रार निवारण दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. या तक्रार निवारण दिनाचे आयोजन दर शनिवारी पोलिस ठाणे येथे करण्यात येणार आहे. पोलीस ठाण्यास प्रलंबित असणाऱ्या तक्रारीच्या जास्तीत जास्त नागरिकांनी त्यांचे प्रलंबित तक्रारीचे निवारण करण्यासाठी संबंधित पोलिस स्टेशनला समक्ष उपस्थित राहुन निराकरण करावे. सर्व नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन गोंदिया जिल्हा पोलीस प्रशासनतर्फे करण्यात आले आहे.

### ग्राम पंचायतीचे साहित्य लंपास

**अर्जुनी मोर :** तालुक्यातील इटखेडा ग्राम पंचायत प्रशासनाकडून स्वच्छ भारत मिशन टप्पा-२ अंतर्गत सांडपाणी व घनकचरा साठवून ठेवण्याच्या कामानिमित्त ठेवलेली साहित्य अज्ञात चोरट्यांनी लंपास केली. ही घटना १५ व १६ जानेवारीच्या रात्री दरम्यानची आहेत. चोरीस गेलेले साहित्य १५ हजार रुपए किंमतीचे होते. फिर्यादीच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

### ट्रॅक्टरसह रेती जप्त

**गोंदिया :** दवनीवाडा पोलिस ठाण्यांतर्गत लोधीटोला दवनीवाडा मार्गावर अवैधरित्या विनापास परवाना ट्रॅक्टरमध्ये रेती वाहतूक करीत असल्याची माहिती पोलिसांनी ट्रॅक्टरसह रेती जप्त करून एकूण ५ लाख ६ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला. आरोपीने घाटावरून ट्रॅक्टर एक ब्रास रेती किंमत ६ हजार रुपये भरून लोधीटोला-दवनीवाडा मार्गावरून जात असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी ट्रॅक्टर थांबवून पंचासमक्ष कारवाई केली असता, विनापास परवाना अवैधरित्या रेतीची वाहतूक करतांना आढळला. पोलिसांनी ट्रॅक्टरसह रेती जप्त केली आहे. फिर्यादी पोउपनि. महेश राठोड यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

### १६० प्रकरण तडजोडीतून निकाली

**गोंदिया :** जिल्ह्यात २०२४ या वर्षात पोलिसांच्या भरोसा सेलकडे ४३२ जणांच्या कौटुंबिक हिंसाचाराच्या तक्रारी आल्या. यात ३५१ महिला, तर ८१ पुरुषांचा समावेश आहे. यातील १६० प्रकरणांत तडजोड करून त्या कुटुंबांत आता चैतन्य फुलले आहे. ९० प्रकरणे स्वतंत्र तर ९८ प्रकरणे फाइल करण्यात आली आहेत. ३९ प्रकरणांत गुन्हे दाखल करण्यासाठी पोलिस ठाण्यांकडे पाठविण्यात आले तर ९२ प्रकरणे प्रलंबित आहेत.

२०२४ या वर्षात कौटुंबिक हिंसाचाराच्या तब्बल ४३२ तक्रारी पोलिस दलाच्या महिला तक्रार निवारण केंद्राकडे दाखल झाल्या आहेत. तक्रारींचा हा आलेख दररोज वाढत चालला आहे. त्यामुळे महिलांच्या सुरक्षिततेचा मुद्दा चर्चेचा आणि काळजीचा विषय बनला आहे. कौटुंबिक हिंसाचाराच्या प्रकरणांचा आढावा घेतला असता अशा प्रकरणांत गत काही वर्षांत वाढ झाल्याचे दिसून आले. हे वाढते प्रमाण चिंताजनक असल्याचे पोलिसांच्यावतीने सांगण्यात येत आहे. जिल्ह्यात महिलांच्या छळाप्रकरणी दाखल तक्रारींचा आढावा घेत, घरातील किरकोळ वादासह काही जण लग्नानंतर आवडत नाही. चारित्र्यावर संशय आणि हुंड्याची मागणी, ही महिलांच्या शारीरिक आणि मानसिक छळाची प्रमुख कारणे असल्याचेही दिसून येत आहे.

# पंचायत समिती सभापतिपदावर भाजपचे ६, काँग्रेस १ व राकाँच्या एकाची निवड

## जिल्ह्यातील ८ पंचायत समितीवर सभापती व उपसभापतींची निवडणूक

**लोकशाही वार्ता / गोंदिया**

जिल्ह्यातील आठही पंचायत समितीचे नवे शिलेदार कोण होणार? या बाबीची राजकीय वतुर्ळात उत्कंठा होती. २० जानेवारी रोजी पुढील अडिच वषार्साठी पिठासिन अधिकाऱ्याच्या उपस्थितीत निवड प्रक्रिया पार पडली. दरम्यान अजुर्नी मोरगाव वगळता सर्वच पंचायत समितीच्या ठिकाणी अविरोध निवडणूक पार पडली. जिल्ह्यातील आठ पंचायत समिती पैकी ६ ठिकाणी भाजपचे आपले वर्चस्व कायम ठेवता आले तर एक ठिकाणी काँग्रेसचे वर्चस्व कायम राहिले त्याच बरोबर राष्ट्रवादी काँग्रेसची अर्जुनी मोरगावात आरक्षणामुळे लॉटरी लागली.

## गोंदियाच्या सभापतिपदी रहांगडाले यांची फेरनिवड



गोंदिया पंचायत समितीच्या सभागृहात काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचे स्पष्ट बहुमत आहे. दरम्यान आज आमदार विनोद अग्रवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत सभापती पदासाठी मुनेश्वर रहांगडाले यांची फेर निवड करण्यात आली तर उसभापतीपदी पद राष्ट्रवादीच्या कोट्यात गेले. त्यानुरूप राष्ट्रवादीकडून शिवलाल जमरे यांची निवड करण्यात आली. यानंतर दोन्ही पदासाठी नामांकन अर्ज दाखल करण्यात आले. पिठासिन अधिकाऱ्याकडे एक-एक अर्ज असल्यामुळे सभापती पदावर मुनेश्वर रहांगडाले तर उपसभापती पदावर शिवलाल जमरे यांची निवड झाल्याचे जाहिर करण्यात आले.

## देवरीच्या सभापतीपदी बिसेन तर उपसभापती गुरनुले



देवरी पंचायत समितीचे सभापती पद सर्वसामान्यकरिता होते. दरम्यान आज निवडणूक प्रक्रियेपुर्वी पक्ष श्रेष्ठींकडून सर्व सदस्यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत सर्वसम्मतीने सभापती पदासाठी अनिल बिसेन तर उपसभापती पदासाठी शालिकराम गुरनुले यांच्या नावावर सम्मती दर्शविण्यात आली. त्यानुरूप भाजपकडून सभापती व उपसभापती पदासाठी पिठासिन अधिकाऱ्याकडे एक-एक अर्ज दाखल करण्यात आले. दोन्ही पदासाठी एक-एक अर्ज असल्यामुळे पिठासिन अधिकाऱ्यांनी सभापतीपदी अनिल बिसेन तर उपसभापतीपदी शालिकराम गुरनुले यांची निवड झाल्याचे जाहीर केले.

## गोरेगावात सभापतिपदी चौधरी तर उपसभापती महारवाडे



गोरेगाव पंचायत समितीमध्ये भाजपकडे स्पष्ट बहुमत आहे. सभापती पद सर्वसाधारण महिलाकरिता आरक्षित होते. या पदासाठी भाजपकडे तीन महिला सदस्य इच्छुक होत्या. पक्ष श्रेष्ठींनी एकमताने सभापती पदासाठी सौ. चित्रलेखा चौधरी तर उपसभापती पदासाठी किशोर महारवाडे यांची निवड केली. त्यामुळे भाजपकडून एक-एकच अर्ज दाखल करण्यात आले होते. दोन पदासाठी एकच अर्ज असल्यामुळे पिठासिन अधिकारी तथा तहसीलदार यंनी दोन्ही पदाधिकाऱ्यांनी अविरोध निवड केली.

## आमगावात दोन्ही पदावर लाडक्या बहिणी

### सभापती योगिता पुंड तर उपसभापती सुनंदा उके



आमगाव पंचायत समितीचे सभापती पद सर्वसामान्य महिला करिता राखिव होते. त्यातच तालुक्यातील पक्ष श्रेष्ठींनी सभापती पदासह उपसभापती पदाची माळ महिलांच्या गळ्यात घालण्याचा निर्णय घेवून लाडक्या बहिणींना प्राधान्य दिले. त्यानुरूप आमगाव पंचायत समितीच्या सभापतीपदी योगिता पुंड तर उपसभापतीपदी सुनंदा उके यांची अविरोध निवड करण्यात आली. निवडणूक प्रक्रियेपुर्वी पक्ष श्रेष्ठींकडून पं.स.सदस्यांची बैठक घेण्यात आली. दरम्यान दोन्ही पद महिलांना बहाल करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुरूप सर्वसम्मतीने सभापती व उपसभापती पदासाठी नाव निश्चित करण्यात आले. त्यानंतर सभापती पदासाठी तिगाव पं.स. क्षेत्राच योगिता पुंड व उपसभापती पदासाठी ठाणा पं.स. क्षेत्राचे सुनंदा उके यांनी नामांकन दाखल करण्यात आले. पिठासिन अधिकाऱ्याने निवडणूक प्रक्रिया पार पाडून दोन्ही पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर केली.

## तिरोड्यात सभापतिपदी चव्हाण तर उपसभापती सुनंदा पटले



तिरोडा पंचायत समितीवर भाजपचे वर्चस्व आहे. पुढील अडिच वषार्साठी सभापती पदाच्या निवडीकरिता पक्ष श्रेष्टींच्या उपस्थितीत निवडणूक प्रक्रियापुर्वी सदस्यांची बैठक घेण्यात आली आहे. दरम्यान एकमताने सभापती पदासाठी तेजराम चौव्हाण तर उपसभापती पदासाठी सौ. सुनंदा पटले यांचे नाव निश्चित करण्यात आले. त्यानुरूप पक्षाच्या वतीने सभापती पदासाठी तेजराम चव्हाण व उपसभापती पदासाठी सौ. सुनंदा पटले यांचे नामांकन दाखल करण्यात आले. दोन्ही पदासाठी एक-एक अर्ज असल्यामुळे पिठासिन अधिकाऱ्यांनी दोन्ही उमेदवारांची अविरोध निवड करण्यात आली.

## अर्जुनी/मोर. येथे सभापतिपदी डोंगरवार तर उपसभापतिपदी कापगते



अर्जुनी मोरगाव पं.स.वर भाजपचे वर्चस्व असले तरी आज पक्षांतर्गत भतभेद चांगलाच पक्षाला भोवला. निवडणुकीपुर्वी घेण्यात आलेल्या पं.स.पदाधिकाऱ्यांच्या सभेत पक्ष श्रेष्ठींकडून उपसभापती पदासाठी नुतन सोनवाने यांच्या नावावर सहमती दर्शविण्यात आली. मात्र या सम्मतीला भाजपच्या तीन सदस्यांनी विरोध दर्शवून काँग्रेसच्या सोबतीने उपसभापती पद बळकावले. अर्जुनी पं.स.च्या सभापती पदाची निवडणूक अविरोध पार पडली तर उपसभापती पदावर भाजपचे बंडखोर संदीप कापगते यांनी विजय संपादन केले.

## सालेकसाच्या सभापतिपदी वीणा कटरे तर उपसभापती बल्लारे



सभापती पदासाठी भाजपकडून अर्चना मडावी तर काँग्रेस कडून सौ. विना कटरे यांचे नामांकन दाखल करण्यात आले होते. तर उपसभापती पदासाठी भाजपचे गुमानसिंग उपराडे व काँग्रेसचे जितेंद्र बल्लारे यांचे नामांदन दाखल करण्यात आले. नामांकन छाणनीनंतर पिठासिन अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली निवड सभा घेण्यात आली. दरम्यान सभापती पदासाठी काँग्रेसच्या विनाताई कटरे यांना ८ पैकी ६ तर भाजपच्या अर्चना मडावी यांना २ मते मिळाली तसेच उपसभापती पदाचे कांग्रेसचे जितेंद्र बल्लारे यांना ६ तर गुमानसिंह उपराडे यांना २ मते मिळाली. कांग्रेसचे दोन्ही उमेदवारांनी प्रतिस्पर्धी उमेदवारावर ४ विजय प्राप्त केले.

## सडक/अ.च्या सभापतिपदी वडगाये तर उपसभापती काशिवार



सडक अर्जुनी पं.स.च्या सभापती पद अनुसुचित जमाती प्रवगार्साठी आरक्षित होते. या पं.स.वर भाजपचे वर्चस्व आहे. दरम्यान सभापती पदासाठी भाजपकडे दोन इच्छुकांची नावे होती. त्यातील चेतन वेडगाये यांची सभापती पदासाठी तर सौ. निशा काशिवार यांची उपसभापपती पदासाठी पक्षाच्या बैठकीत निवड करण्यात आली. त्यानुरूप पिठासिन अधिकाऱ्याकडे सभापती व उपसभापती पदासाठी एक-एक अर्ज दाखल करण्यात आले होते. दोन्ही पदा\साठी एक-एक अर्ज असल्यामुळे पिठासिन अधिकारी तथा तहसीलदार यांनी निवडणूक प्रक्रिये दरम्यान सभापतीपदी चेतन वेडगाय व उपसभापतीपदी सौ. निशा काशिवार यांनी अविरोध निवड झाली.

# ५ वर्षांपासून फरार आरोपी रेल्वे पोलिसांनी पकडले

**लोकशाही वार्ता / गोंदिया**

गोंदिया रेल्वे पोलिसात दाखल गुन्ह्यातील आरोपी गेल्या ५ वर्षांपासून फरार होता. सदर आरोपीचा शोध घेत गोंदिया पोलिसांनी अखेर त्याला बिहार राज्यातून जेरबंद करण्यात यश मिळविले. निजामुद्दीन शेख फरमुद्दीन शेख (५०) रा.शिवगंज बालुवडी (बिहार) असे आरोपीचे नाव आहे.

आरोपी निजामुद्दीन शेख याच्याविरूध्द गोंदिया रेल्वे पोलिसात कलम ३२८, ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद होता. मात्र सदर आरोपी गेल्या ५ वर्षांपासून फरार होता. रेल्वे पोलिसांनी शोध घेतला मात्र काही पत्ता लागला नाही. त्यामुळे आरोपीला फरार घोषित करण्यात आले होते. पोलिस अधिक्षक प्रियंका नारनवरे, उपअधिक्षक दत्ता राठोड, उपविभागीय अधिकारी पांडूरंग सोनवने यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि प्रतिभा राऊत यांच्या नेतृत्वात गोंदिया रेल्वे पोलिसांनी फरार आरोपीचा शोध घेतला. दरम्यान नेपाळ राज्याच्या सिमे लगत असलेल्या बिहार राज्यातील दुर्गम भागात आरोपी निजामुद्दीन शेख राहत असल्याची माहिती मिळाली. यावरून बिहार पोलिसांच्या मदतीने त्याला जेरबंद करण्यात आले. ही कारवाई पोहवा विनोद खोब्रागडे, धिरेंद्र कटुके यांनी केली.

# अवैध रेती वाहतूक करणारा ट्रक पकडला

## २७ लाख ९ हजारांचा माल जप्त

**लोकशाही वार्ता / अर्जुनी/मोर**

सडक/अर्जुनी तालुक्याच्या सौंदड येथील चुलबंद नदीच्या घाटातील रेतीचा उपसा करून रेतीची अवैधपणे वाहतूक करणाऱ्या एका ट्रकला महसूल विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पकडला. ही कारवाई १८ जानेवारी रोजी सकाळी ८ वाजता नवेगाव/बांध येथे करण्यात आली. या प्रकरणी २७ लाख ९ हजार रुपए किमतीचा माल जप्त केला.

चुलबंद नदी घाटावर अवैधरित्या रेती उपसा करून वाहतूक सुरू आहे. या संदर्भात अनेक तक्रारी होत्या. त्यानुरूप (ता.१८) ट्रक क्र.एमएच-३५/एजे- ४२३९ अवैधरित्या रेती वाहतूक करताना आढळून आला. महसूल विभागाच्या पथकाने ट्रक अडवून पास परवाना विचारला असता कोणत्याही प्रकारचा परवाना आढळून आला नाही. यावर कारवाई करून २७ लाख रुपये तसेच २ ब्रास रेती किंमत ९ हजार रुपये असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी ट्रक मालक



शुभम विलास नागदेवे व ट्रक चालक राहुल सुकाली भोयर रा.कनेरी, ता.सडक/अर्जुनी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ही कार्रवाई अर्जुनी/मोरगावचे उपविभागीय अधिकारी वरुणकुमार सहारे, तहसीलदार अनिरुद्ध कांबळे यांच्या मार्गदर्शनात नवेगाव/बांध चे मंडळ अधिकारी उमराव वाघधरे व महसूल सेवक एस.के सांगोळकर यांनी केली आहे.

# ग्रामीण रुग्णालयात एकाच दिवशी २२ सिझर

## रुग्णालयाचे भाग्य उजळले; शस्त्रक्रियातज्ज्ञ डॉ.पटले यांची कामगिरी




### दररोज २०० ते ३०० रुग्णांवर उपचार

**गेल्या काही दिवसांपासून गोरेगाव ग्रामीण रूग्णालयाचा सेवेला घेवून सकारात्मक प्रतिक्रिया निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे गोरेगाव नागरी क्षेत्रासह ग्रामीण भागातील रूग्णांचा कल देखील वाढत चालला आहे. दररोज २०० ते ३०० रूग्णांवर उपचार केला जात आहे. एवढेच नव्हेतर आंतररूग्ण सेवेत वाढ झाली आहे.**

**लोकशाही वार्ता / गोरेगाव**

एकेकाळी ग्रामीण रूग्णालयात येणाऱ्या रूग्ण दारात आला की रेफर टु गोंदिया अशी प्रथा सुरू होती. त्यामुळे रूग्णांनी देखील रूग्णालयाकडे पाठ फिरविणे सुरू केले होते. मात्र सेवाभाव आणि कर्तव्यातून समाजसेवा करण्याचा मनुसबा बाळगणारे शस्त्रक्रिया तज्ज्ञ डॉ.पी.के.पटले हे रूग्णालयात रूजू होताच सेवेचे चित्र पालटले. परिणामी गोरेगाव ग्रामीण रूग्णालयाचे भाग्य उजळल्याची प्रतिक्रिया उमटे नागरी आहे. आता ग्रामीण रूग्णालयाच्या शस्त्रक्रिया कक्षही दिवसभर व्यस्त राहत आहे. तीन दिवसांपूर्वी एकाच दिवशी तब्बल २२ शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

गोरेगाव ग्रामीण रूग्णालय काही वर्षापूर्वी सेवेला घेवून चांगलाच चर्चेत आला होता. रेफर टु गोंदिया अशीच प्रथा सुरू असल्यामुळे रूग्णालयाच्या सेवेपासून रूग्णही चांगलेच दुरावत चालले होते. साधारण प्रसुतीसुध्दा रूग्णालयात होत नव्हती. गोंदिया शिवाय पर्याय नसल्याने ग्रामीण रूग्णालयात उपचार घेण्यापेक्षा थेट गोंदिया येथील रूग्णालयात उपचारासाठी जाणे रूग्णांना भाग पडत होते. मागील मार्च महिन्यापासून वैद्यकीय अधिकारी अधिक्षक म्हणून डॉ.पी.के.पटले हे गोरेगाव ग्रामीण रूग्णालयात रूजू झाले. डॉ.पी.के.पटले हे शस्त्रक्रिया तज्ज्ञ आहेत. त्यामुळे त्यांनी शस्त्रक्रियेला प्राधान्य देत लहानसहान शस्त्रक्रिया रूग्णालयातच करण्याची परवानगी घेतली. त्याचबरोबर रूग्णालयात येणाऱ्या प्रत्येक रूग्णावर प्राथमिकच काय?, जिथपर्यत रूग्णालयात सेवा देवू शकतो, तोपर्यंत रूग्णाला गोंदियाला रेफर करू नये, अशी भुमिका घेतली.

परिणामी आज गोरेगाव रूग्णालयात बाह्यरूग्णांची संख्या झपाट्याने वाढली आहे. त्याचबरोबर आंतररूग्ण सेवाही सुधारुन वाढत चालली आहे. एवढेच नव्हेतर डॉ.पी.के.पटले यांच्या सेवाभावी वृत्तीमुळे रूग्णही गोंदियापेक्षा गोरेगाव बरा असे समजून गोरेगाव ग्रामीण रूग्णालयातच उपचार घेणे पसंत करीत आहेत. त्यामुळे ग्रामीण रूग्णालयात शस्त्रक्रियांचे प्रमाणही वाढत चालले आहे. दोन दिवसांपूर्वी तब्बल एकाच २२ शस्त्रक्रिया करण्यात आल्या. यामध्ये दोन हर्निया, दोन हॅड्रोसिल, एक फिर्मॅसिस, १३ कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया, एक पुरूष नसबंदी अशा शस्त्रक्रिया करण्यात आल्यात. डॉ.पी.के.पटले यांच्या कामगिरीमुळे आरोग्य सेवेला घेवून गोरेगाव ग्रामीण रूग्णालयाचे भाग्य उजळले, अशीच प्रतिक्रिया जिल्ह्यात उमटू लागली आहे.

### परजिल्ह्यातील रुग्णही गोरेगावात

**डॉ.पी.के.पटले हे यापुर्वी गडचिरोली जिल्ह्यातील ब्रम्हपुरी येथील उपजिल्हा रूग्णालयात सेवेवर होते. त्या ठिकाणीही त्यांची सेवा समाधानी असल्यामुळे अनेक रूग्ण तेथून गोरेगावात पोहोचून उपचार करवून घेत आहेत. लहानसहान शस्त्रक्रिया करण्यासाठीही परजिल्ह्यातील रूग्ण गोरेगावात पोहोचत आहेत.**

### रुग्णालयात प्रसूतीकडे वाढला कल

**खासगी रूग्णालयात प्रसुतीचा खर्च परवडण्यासारखा राहत नाही. तर दुसरीकडे १४ ते २० किमी अंतरावर असलेल्या गोंदिया येथील शासकीय रूग्णालयात जावून प्रसुती करणेही परवड नाही. अशातच गोरेगाव ग्रामीण रूग्णालयात डॉ.पी.के.पटले यांच्या पुढाकाराने साधारण प्रसुतीचे प्रमाण वाढत चालले आहे. यामुळे रूग्णालयात प्रसुतीकडे ग्रामीण क्षेत्रातील महिलांचा कलही वाढत चालला आहे.**

लोकशाही वार्ता
# गडचिरोली
गुड मॉर्निंग
नागपूर, मंगळवार, २१ जानेवारी २०२५/१२
epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta

### मुख्य मार्गावर खड्डा, अपघाताचा धोका

**गडचिरोली:** शहरातील इंदिरानगरातील मुख्य रस्ता सिमेट कॉंक्रिटचा आहे. या रस्त्यावर अल्पावधीतच खड्डे पडले आहेत. या रस्त्यावरून वाहने नेताना वाहनधारक त्रस्त आहेत. अल्पावधीतच मार्गाची दुरवस्था झाली आहे. शहरात वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत सिमेंट कॉंक्रिट रस्त्याचे बांधकाम करण्यासाठी राज्य शासनाने निधी दिला. सदर रस्ते राष्ट्रीय महामार्गाप्रमाणे मजबूत बनवायचे होते. मात्र, उल्पावधीतच रस्त्यांवर खड्डे पडले. या रस्त्यांवर देखरेख ठेवण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाचे असताना ते याकडे दुर्लक्ष करीत आहेत.

### चुरचुरा-पिपरटोला मार्गाची दैनावस्था

**गडचिरोली:** तालुक्यातील चुरचुरा-पिपरटोला हा परिसरातील महत्वाचा मार्ग आहे. पिपरटोलानंतर पुढे धुडेशिवणी, अमिर्झा येथे जाता येते. कुऱ्हाडी, महादवाडी परिसरातील अनेक नागरीक याचा मार्गाने जातात. हा मार्ग जंगलाने व्यापलेला आहे. त्यामुळे वाहनधारक वेगाने वाहने नेतात. मात्र या मार्गाची मागील अनेक वर्षापासून दुरुस्ती न करण्यात आल्याने रस्त्याची दुरवस्था झाली आहे. मार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असल्याने अपघाताची शक्यता बळावली आहे. त्यामुळे सदर मार्गाकडे संबंधित विभागाने लक्ष देऊन सदर मार्गाची तत्काळ दुरूस्ती करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

## दृष्टिक्षेप

### हवामानानुसार पिकांची निवड करा!

**गडचिरोली:** गेल्या चार ते पाच वर्षापासून निसर्गाचा लहरीपणाचा अनुभव सतत येत आहे. कधी अवकाळी पाऊस, कधी गारपीट तर कधी ढगाळ वातावरण राहत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी हवामानानुसार पिकांची निवड करावी, असा सल्ला कृषी विभागाने दिला आहे.

हवामान बदलाचा परिणाम कृषी क्षेत्रावर आणि तेथील पीक पद्धतीवर वेगवेगळा होत असल्यामुळे हवामान बदलाचा पीक उउत्पादनावर परिणाम होत असतो. येत्या खरीप हंगामात हवामान बदलाचा विचार करून शेतकऱ्यांनी योग्य पिकाची निवड केल्यास उत्पादन चांगले यहेते. त्यामुळे कृषी विभागाचा सल्ला आवश्यक आहे. असे कृषी विभागाने म्हटले आहे.

### पिसेवडधा-सुरसुंडी मार्गाचे डांबरीकरण करा

**गडचिरोली:** आरमोरी तालुक्यातील पिसेवडधा ते धानोरा तालुक्यातील सुरसुंडी या मार्गाचे खडीकरण होवून त्यावर बारीक गिट्टी टाकल्यामुळे बाईक घसरून अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे. तसेच्या कच्च्या गिट्टीने दुचाकी व चारचाकी वाहनाना धोकादायक असल्याने असल्याने या रस्त्याचे डांबरीकरण करण्याची मागणी वाहनधारक व परिसरातील नागरिकांनी केली आहे. आरमोरी आणि धानोरा तालुक्याला जोडणारा हा मार्ग असुन पिसेवडधा ते सुरसुंडी या गावातील अंतर २३ किलो मिटर आहे. या मार्गावर अनेक गावे आहेत. हा मार्ग रहदारीचा असल्याने या मार्गावरील नेहमीच वाहनांची वर्दळ असते. मात्र याचा त्रास सर्व लोकांना होत आहे. संबंधि विभागाने वेळीच खबरदारी घेऊन डांबरीकरण करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

# गडचिरोली जिल्ह्यातील ५० आदिवासी युवकांची तुकडी कोचीला रवाना

## भारत सरकार, तसेच केंद्रीय रिझर्व पोलिस दलाच्या आदिवासी युवा आदान-प्रदान कार्यक्रम

**लोकशाही वार्ता/ गडचिरोली**

नेहरू युवा केन्द्राचा युवा कार्यक्रम आणि खेळ मंत्रालय भारत सरकार, तसेच केंद्रीय रिझर्व पोलिस दलाच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील ५० आदिवासी युवकांची तुकडी कोची (केरळ) येथे होणाऱ्या आदिवासी युवा आदान-प्रदान कार्यक्रमासाठी रवाना करण्यात आली. यानिमित्त आयोजित प्रस्थान कार्यक्रमांमध्ये खासदार डॉ.नामदेव किरसान यांनी उपस्थिती राहून युवकांना मार्गदर्शन केले आणि हिरवी झेंडी दाखवत युवकांच्या वाहनाला रवाना केले.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सीआरपीएफचे उपमहानिरीक्षक अजय कुमार शर्मा होते. यावेळी खा.डॉ.किरसान यांनी युवकांशी संवाद साधताना या कार्यक्रमाच्या माध्यमातून युवांनी बाह्य जगाची माहिती मिळवावी. इतर राज्याची आदिवासी संस्कृती, कला आणि इतर सामाजिक गोष्टीची माहिती प्राप्त करून त्यातून आपला सामाजिक विकास साधण्याचा प्रयत्न करण्याचे आवाहन केले. सोबतच प्राप्त झालेल्या ज्ञानातून जिल्ह्याच्या विकासात योगदान द्यावे, असे आवाहन केले.

या कार्यक्रमाला डेप्युटी कमांडंट सुमित वर्मा, जिल्हा युवा अधिकारी अमित पुंडे, सेवानिवृत्त नायब तहसीलदार सुनील चडगुलवार, रुपेश टिकले, गौरव येनप्रेड्डीवार, अनुप कोहळे उपस्थित होते. उपस्थितांचे आभार केंद्रीय पोलिस दलाचे निरीक्षक अनंत जगदाळे यांनी मानले.

यावर्षी गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली, अहेरी आणि भामरागड या तीन तालुक्यातील ४५० युवक-युवती भारतातील ९ वेगवेगळ्या शहरांना भेट देणार आहेत. कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आदिवासी तरुणांना भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाची जाणीव करून देणे आणि त्यांना विविधतेतील एकतेची संकल्पना आत्मसात करणे, तसेच त्यांना विकासात्मक उपक्रम आणि औद्योगिक प्रगतीची जाणीव करून देणे हा आहे.

# लॉयड्स काली अम्माल मेमोरियल हॉस्पिटलतर्फे आलदंडीत आरोग्य शिबिर

## आजही सुरू राहणार तपासणी शिबिर

**लोकशाही वार्ता/अहेरी**

तालुक्यातील आलदंडी येथे लॉयड्स काली अम्माल मेमोरियल हॉस्पिटलतर्फे भव्य आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन रविवारी (दि.१९) आणि सोमवार (दि.२०) सकाळी ९ ते सायंकाळी ४ वाजेदरम्यान करण्यात आले आहे. सदर शिबिराचे उद्घाटन आलदंडी पोलिस स्टेशनसमोरील प्रांगणात करण्यात आले.



या शिबिरामध्ये डोळ्यांची तपासणी, चष्मे बनविणे, त्वचा विकाराची तपासणी आणि वैद्यकीय सल्ले, हाडांच्या विकारावर तपासणीसाठी तज्ज्ञांचा सल्ला, कान, नाक व घसा तपासणी करून तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन, मुले व महिलांची आरोग्य तपासणी केली जात आहे.

लॉयड्स मेटल्स कंपनीचे डायरेक्टर व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरन यांच्या संकल्पनेतून आयोजित या शिबिराचे उद्घाटन लॉयड्सचे अधिकारीगण भास्कर, साई कुमार, अरुण रावत, ले.कर्नल (नि) विक्रम मेहता, सुनिता मेहता, बलराम सोमनानी, रोहित तोम्बलावार, संजय चांगलानी, तोडसाच्या सरपंच वनिता कोरामी, महेश मट्टामी पाटील (आलदंडी), उपविभागीय पोलिस अधिकारी चैतन्य कदम (एटापल्ली), पीएसआय कुंभारे (आलदंडी), माजी पं.स.सभापती जनार्दन नल्लावार (एटापल्ली) यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

# शेतकऱ्यांना अखंडीत वीज पुरवठा मिळणार

## महायुतीच्या विजयानंतर शेतकऱ्यांची अपेक्षा

**लोकशाही वार्ता/गडचिरोली**

आज विधानसभेच्या निवडणुकीचा निकाल लागुन राज्यात महायुती सरकारला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. यामुळे आता जिल्ह्यातील शेतक?यांना अखंडीत विज पुरवठा मिळावा अशी अपेक्षा जिल्ह्यातील शेतकऱ्यातून व्यक्त केली जात आहे.

राज्यातील शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना दिवसा अखंडित व भरवशाचा वीज पुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० चा विस्तार करून त्याची व्याप्ती वाढविण्यास नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली होती. राज्यात शेतकऱ्यांच्या कृषीपंपांना दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी योजना २.० राबविण्यात येत आहे. या मिशन मोडवरील या योजनेतून २०२५ पर्यंत सौर ऊर्जा

निर्मिती क्षमतेचे उद्दिष्ट वाढवून ९००० मेगावॅट अधिक उर्वरित ७००० मेगावॅट असे १६ हजार मेगावॅट विकेंद्रित सौरऊर्जा क्षमता निर्मिती उद्दिष्टास मान्यता देण्यात आली. यामुळे राज्यातील शंभर टक्के कृषी पंप ग्राहकांना दिवसा वीजपुरवठा करण्याचा उद्देश साध्य होणार आहे. यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत देण्यात येणारे प्रोत्साहनात्मक आर्थिक सहाय्य सुरु ठेवण्यास मान्यता देण्यात आली. नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करावी अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

# विद्यार्थ्यांना बचतीची सवय लावण्यासाठी जिल्हा बँकेच्या स्वप्नसंचयचा शुभारंभ

## विद्यार्थी, पालकांनी लाभ घ्यावा- राजेंद भुयार

**लोकशाही वार्ता/ गडचिरोली**

विद्यार्थ्यांना बचतीची सवय लागावी आणि त्यांना उच्च शिक्षणासाठी कर्जाची सुविधा उपलब्ध व्हावी, एवढेच नाही तर उच्चशिक्षण संपल्यानंतर लहान-मोठे व्यवसाय सुरू करण्यासाठी भांडवल उपलब्ध व्हावे, हा दृष्टिकोन ठेवून गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने स्वप्नसंचय योजना सुरू केली आहे. त्याचा शुभारंभ बँकेच्या मुख्य कार्यालयात जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भुयार आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी विलास कावळे यांच्या प्रमुखय उपस्थितीत करण्यात आला. बँकेचे अध्यक्ष प्रंचित अ.पोरेड्डीवार हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.



या नाविन्यपूर्ण स्वप्नसंचय योजनेचा विद्यार्थ्यांनी व त्यांच्या पालकांनी विद्यार्थ्यांना बचतीची सवय लावण्यासाठी लाभ घ्यावा, असे आवाहन गडचिरोली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भुयार यांनी यावेळी केले.

या कार्यक्रमात बोलताना कॅफो विलास कावळे म्हणाले, बँकेने विद्यार्थ्यांना लहान वयापासून बचतीची सवय लावण्याचा उपक्रम सुरू केल्यामुळे विद्यार्थ्यांना भविष्यात उच्च शिक्षणासाठी कर्ज उपलब्ध होईल. त्यामुळे या संधीचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय मार्गदर्शनात प्रंचित पोरेड्डीवार म्हणाले, विद्यार्थ्यांना बचतीच्या सवयीसोबत उच्च शिक्षणासाठी कोणतेही तारण न घेता कर्ज सुविधा बँकेकडून मिळणार आहे. त्यातही बँकेच्या प्रचलित व्याजदरापेक्षा मुदत ठेवीवर जास्त व्याज आणि सवलतीच्या व्याजदरात कर्ज पुरवठा उपलब्ध होणार आहे.

या कार्यक्रमात गडचिरोली शहर व परिसरातील जिल्हा परिषद, कॉन्व्हेंट व माध्यमिक शाळांमधील विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी स्वप्नसंचय योजनेचे बचत खाते उघडणाऱ्या ७५ विद्यार्थ्यांना बचत किटचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सतीश आयलवार यांनी केले. कार्यक्रमाला बँकेचे उपाध्यक्ष श्रीहरी भंडारी, मानद सचिव अनंत साळवे, संचालक डॉ.बलवंत लाकडे, सुलोचना वाघरे, शाळांचे मुख्याध्यापक, विद्यार्थी, पालक उपस्थित होते. संचालन सरव्यवस्थापक राजू सोरते यांनी तर आभार प्रदर्शन किरण सांबरे यांनी केले.

# मुंबई मॅरेथॉन स्पर्धेत गडचिरोलीकर युवकांची धाव, पोलिसांचा पुढाकार

## प्रोजेक्ट उडान अंतर्गत मिळाली संधी

**लोकशाही वार्ता/ गडचिरोली**

माओवादग्रस्त गडचिरोली जिल्ह्याच्या दुर्गम-अतिदुर्गम भागात राहणा-या युवकांना विविध खेळांमध्ये प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांच्या क्रीडागुणांना वाव मिळण्याकरीता पोलिसांकडून कबड्डी, व्हॉलीबॉल व मॅरॅथॉन यासारखे अनेक उपक्रम राबविले जातात. त्याअंतर्गत प्रोजेक्ट उडानच्या माध्यमातून जिल्ह्यातील २५ युवक-युवती आणि पोलीस अधिकारी व अंमलदारांनी मुंबईच्या टाटा मॅरॅथॉनमध्ये सहभाग नोंदवत आंतरराष्ट्रीय स्पर्धेत गडचिरोलीचे नाव पोहोचवले. विशेष म्हणजे २१ किमी गटात अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) एम.रमेश यांनीही सहभागी होऊन सर्वांचा उत्साह वाढविला.




टाटा मॅरॅथॉनमधील ४२ कि.मी (फुल मॅरॅथॉन), २१ कि.मी. (हाफ मॅरॅथॉन) आणि १०कि.मी. मॅरॅथॉनमध्ये देशातीलच नाही तर आंतरराष्ट्रीय मॅरॅथॉनपटू सहभागी झाले होते. पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांच्या संकल्पनेतून सदर मॅरॅथॉन स्पर्धेत गडचिरोली जिल्ह्याच्या अतिदुर्गम भागातील युवकांना संधी देण्यासाठी ६४ पोस्टे/उपपोस्टे/पोमकेंमधील युवकांची निवड चाचणी घेण्यात आली. त्यानंतर २५ युवक-युवतींची निवड करुन गडचिरोली पोलीस दलातर्फे त्यांना मॅरॅथॉनसाठी लागणारे सर्व साहित्य वाटप करण्यात आले. एवढेच नाही तर राष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञ प्रशिक्षकांकडून योग्य सरावाचे नियोजन करुन दोन महिन्यांचे निवासी प्रशिक्षणही पोलीस मुख्यालयात देण्यात आले.

या प्रशिक्षणादरम्यान युवक-युवतींची शारीरिक क्षमता वाढविण्याकरिता कसून सराव घेण्यात आला. यामध्ये २१ किमी, २५ किमी,३५ किमी व ४२ किमी. धावणे, स्ट्रेन्थनिंग एक्सरसाईज, एबीसी एक्सरसाईज, हिल एक्सरसाईज इ. शारीरिक कवायतींचा समावेश होता. या प्रशिक्षणादरम्यान युवक-युवतींना वेळोवेळी पोलिस अधीक्षक नीलोत्पल व अपर पोलिस अधीक्षक (प्रशासन) एम. रमेश यांनी मार्गदर्शन केले.

२१ किमी. गटात गडचिरोलीचे अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) एम.रमेश, उपनिरीक्षक विश्वंबर कराळे, उपनिरीक्षक ईश्वर सुरवासे, अविनाश कांदो, उमेश मट्टामी, मुकेश रापंजी, नयन गुरनुले, सौरभ कन्नाके, प्रमोद पुराम, राकेश तुलावी, सादु कांदो, ओंकार दर्रो, स्वप्निल गुरनुले, अमित कावळे, सुरज बोटरे, अमोल मडावी, तुषार गावतुरे, श्रेयस वाढई तसेच अमोल पोरटे (४२ किमीमध्ये ३ तास, २४ मी.) आणि २१ किमी या गटात पोअं/२१४ लिलाधर खरबनकर, रोहन भुरसे (२१ किमी १ तास, १९ मी.), प्रियंका ओक्सा (२१ किमी अंतर १ तास, २८ मी.) तसेच साक्षी पोलोजवार (२१ किमी अंतर १ तास, ४५ मी.), पोअं नाजूक मोहुर्ले (१० किमी अंतर ३९ मी. १३ सेकंद) यांनी सहभाग नोंदविला.

# प्रकाश चषकाचा उत्साहात समारोप, अक्षय एलेव्हन संघ ठरला मानकरी

**लोकशाही वार्ता/आरमोरी**

क्रिकेटप्रेमींसाठी पर्वणी ठरलेल्या आरमोरी येथील प्रकाश चषक रात्रकालीन क्रिकेट स्पर्धेच्या चुरसपूर्ण झालेल्या अंतिम सामन्यात आरमोरीच्या अक्षय एलेवन संघाने गडचिरोलीच्या नवशक्ती क्रिकेट संघावर मात करत प्रकाश चषक पटकावला. गडचिरोली नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रकाश सावकार पोरेड्डीवार आणि माजी आ.कृष्णा गजबे यांच्या हस्ते विजेत्या संघाला ३ लाखांचे बक्षीस व चषक देऊन गौरविण्यात आले. उपविजेत्या नवशक्ती संघाला १ लाख ७५ हजार रुपयांचे बक्षीस मिळाले.




युवामंच, प्रकाश चषक आयोजन समिती आणि मॉर्निंग क्रिकेट ग्रुपच्या वतीने या प्रकाश चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावर्षी आयोजनाचे तिसरे पर्व होते. हितकारिणी विद्यालयाच्या क्रीडा संकुलात विद्युत प्रकाशझोतात खेळविल्या गेलेल्या या सामन्यांमध्ये जिल्ह्याबाहेरीलच नाही तर राज्याबाहेरील संघही सहभागी झाले होते. विशेष म्हणजे आयपीएल सामन्यांमधील खेळाडू कामरान खान (हैदराबाद), सागर भंडारी (बंगलोर) हेसुद्धा आरमोरीच्या मैदानात खेळल्याने आरमोरीकरांसह परिसरातील क्रिकेटप्रेमींसाठी हे सामने एक पर्वणी ठरले. समारोपीय कार्यक्रमात मॅन ऑफ द मॅच, उत्कृष्ट गोलंदाज व फलंदाज, उत्कृष्ट खेळाडू अशा विविध पुरस्कारांनी खेळाडूंना सन्मानित करण्यात आले. तसेच यूट्यूबवर थेट प्रक्षेपण दाखविणारे संदेश वाघमारे, लायटिंगची सजावट करणारे साहिल सय्यद, कॉमेंट्री करणारे जी.एम.खान, निलरतन मंडल, स्कोअरर हितेश कोपुलवार यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. बक्षीस वितरण कार्यक्रमाला नगर परिषदेचे माजी उपाध्यक्ष हैदर पंजवाणी, प्राचार्य सचिन खोब्रागडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रताप लामतुरे, पोलीस उपनिरीक्षक सुरज अनपट, पवन नारनवरे, पंकज खरवडे, भारत बावनथडे, सुशील पोरेड्डीवार उपस्थित होते.

# प्रलंबित कामांना गती द्या - जिल्हाधिकारी पंडा

## जिल्ह्यात २३४ पुलांच्या निर्मितीची गरज, आरमोरी मागार्साठी हवे ७४६ कोटी

**लोकशाही वार्ता/ गडचिरोली**

जिल्ह्यातील प्रलंबित रस्ते बांधकामांना गती देण्यासाठी अधिकाऱ्यांनी तातडीने उपाययोजना कराव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी शुक्रवारी घेतलेल्या आढावा बैठकीत दिले. राष्ट्रीय महामार्ग बांधकामांमध्ये येणाऱ्या अडचणींची माहिती एकत्र करून ती सोडवण्यासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्र्यांशी चर्चा करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.




जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत रस्ताविषयक कामांचा आढावा घेण्यात आला. यावेळी सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी राहुल मीना (गडचिरोली), श्रीमती मानसी (देसाईगंज), अमित रंजन (चामोर्शी), नमन गोयल (एटापल्ली), सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता नीता ठाकरे, कार्यकारी अभियंता बळवंत रामटेके (आलापल्ली), सुरेश साखरवाडे, आर.बी. कुकडे (विशेष प्रकल्प सिरोंचा), राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणचे कार्यकारी अभियंता ऋषिकांत राऊत, चंद्रशेखर सालोडकर (प्रधानमंत्री ग्राम सडक योजना), जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता विजय दोरखंडे, उपअभियंता राजेंद्र कटकमवार (विद्युत उपविभाग), सहायक अधीक्षक अभियंता दिनेश पाटील, सुमित मुंडदा प्रामुख्याने उपस्थित होते.

जिल्हाधिकारी पंडा यांनी राष्ट्रीय महामार्ग आलापल्ली ते गुंडेनुर, चामोर्शी-आलापल्ली -सिरोंचा, आरमोरी - गडचिरोली, चातगाव- धानोरा मार्ग, कोरची ते कुरखेडा, तसेच दक्षिण गडचिरोली व उत्तर गडचिरोलीतील महामार्गांच्या बांधकामाचा आढावा घेतला. आरमोरी ते गडचिरोली हा राष्ट्रीय महामार्ग नव्याने बांधकामासाठी ७४६ कोटींचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठवल्याचे संबंधितांनी सांगितले. सदर काम पूर्ण होईपर्यंत सध्याच्या मार्ग दुरुस्तीसाठी तसेच पावसाळ्यात पाल नदीवर नागपूर मार्ग बंद होत असल्याने याबाबत अडचणी कशा सोडवता येतील यावर चर्चा करण्यात आली. जिल्ह्यात विशेषता चामोर्शी व एटापल्ली तालुक्यात मोठ्या प्रमाणात जड वाहतूक वाढेल. यामुळे राज्य महामार्ग लवकर खराब होतात. त्यामुळे या मार्गाच्या गुणवत्तेत अधिक वाढ करण्याची आणि ज्या निकषांच्या अधीन राहून हे मार्ग बांधण्यात येतात, त्यात बदल करण्याचे प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. जिल्ह्यात २३४ पुलांच्या निर्मितीची आवश्यकता आहे, मात्र त्यासाठी एकत्रितपणे मोठा निधी उपलब्ध होण्यास विलंब होऊ शकतो. त्यामुळे प्राधान्यक्रम ठरवून महत्त्वाच्या पुलांचे प्रस्ताव टप्प्याटप्प्याने सादर करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. केंद्र शासनाच्या निधीतून सुरू असलेली कामे प्राधान्याने पूर्ण करावी, तसेच या आर्थिक वर्षात मंजूर प्रकल्प मार्च २०२५ पर्यंत पूर्ण करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. याबाबत एप्रिलमध्ये पुन्हा आढावा घेण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# गावाच्या एकीतून पाच वर्षापासून मारोडा गाव दारूविक्री बंद

**लोकशाही वार्ता/गडचिरोली**

गडचिरोली तालुक्यातील मारोडा गावाला दारूविक्री बंदी होऊन नुकतेच पाच वर्ष पूर्ण झाले आहे. मारोडा हे ९०० लोकसंख्या असलेले गाव गडचिरोली वरून १६ किलोमिटर अंतरावर आहे. या गावात २०१९ या वर्षात अवैध दारूविक्री सुरू झाली होती.

मात्र तमुस समिती, ग्रामपंचायत, गाव संघटनेने एकत्र येत मुक्तिपथ तालुका चमुच्या मार्गदर्शनातून दारूबंदीला धक्का देणा?या विक्रेत्यांना चांगलाच धडा शिकवला व अवैध दारूविक्री हद्दपार केली व आता मागील 5 वर्षांपासून हे गाव दारूबंदीसाठी प्रसिद्ध म्हणून नावारूपास आले आहे.

ग्रापं प्रशासन व गावसंघटन व पदाधिकारी यांच्या माध्यमातुन दारू विक्रेत्यांविरोधात कृती कार्यक्रम करून त्यांना वेगवेगळे दंड आकारून धडा वेळोवेळी शिकविण्यात आला आहे. मुजोर दारू विक्रेत्याविरोधात कायदेशीर कार्यवाही करण्यात आली. इत्यादि सतत केलेल्या प्रयत्नातून गाव दारू विक्री बंदी म्हणून टिकून आहे.

गावात दारू मिळत नसल्याने होणारे भांडणतंटे कमी झाले आहे, गावात होणारे मोठे कार्यक्रम शांततेत होत आहे. महिलांना दारूविक्री बंदीचा विशेष अभिमान व आनंद आहे. गावात पुन्हा दारू सुरू होऊ नये यासाठी दर महिन्याला संघटनेची बैठक गावात घेतल्या जाते. दारू पिणा?या व्यक्तिचे व्यसन सुटावे यासाठी मुक्तिपथ च्या माध्यमातून व्यसन उपचार शिबीर गावात घेण्यात आले आहे.

दारूमुक्तीसाठी मॅरॅथॉन, विजयस्तंभ, शाळा जाणीव जागृती कार्यक्रम घेऊन जागृती केली जात आहे. गावात कुणीही दारूविक्री करू नये, याकरिता ५ वर्षापासून गाव संघटन व तंटामुक्त समिती, ग्रामपंचायत समिती गावात पाळत ठेवत आहे.

लोकशाही वार्ता
# वर्धा
गुड मॉर्निंग
नागपूर, मंगळवार, २१ जानेवारी २०२५/९
epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta

## दुकानासमोरून दुचाकी चोरी

**वर्धा :** अज्ञात चोरट्याने दुकानासमोरून दुचाकी चोरून नेली. ही घटना गांधी चौक आर्वी येथे घडली. याप्रकरणी आर्वी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. आर्वी येथील सुमीत राजुरकर यांनी एमएच ३२ एएफ ६४३३ क्रमांकाची दुचाकी दुकानापुढे उभी ठेवली होती. घरी जाण्याकरिता ते दुचाकीजवळ गेले असता त्यांना दुचाकी दिसली नाही. शोध घेऊनही दुचाकी न मिळाल्याने पोलिस ठाण्यात तक्रार करण्यात आली. पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## विष प्राशन केलेल्या व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू

**वर्धा :** विष प्राशन केलेल्या व्यक्तीचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. याप्रकरणी सावंगी (मेघे) पोलिसांनी गुन्हा दाखल केला. प्रफुल्ल भूजंगराव दाते (वय ५९) रा. पांढरकवडा असे मृताचे नाव आहे. प्रफुल्ल दाते यांनी आर्थिक विवंचनेत मनावर विपरित परिणाम होऊन शेतात विष प्राशन केले. त्यांना उपचाराकरिता रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## यूटीआय म्युच्युअल फंड वर्धा येथे सुरू करणार नवीन वित्तीय केंद्र

**वर्धा :** यूटीआय ॲसेट मॅनेजमेंट कंपनी (यूटीआय एएमसी) ने महाराष्ट्रातील वर्धा येथे पहिला मजला, ग्रेस टॉवर्स, बँक ऑफ इंडियाच्यावर, महादेवपुरा, वर्धा, महाराष्ट्र ४४२००२ येथे आपले यूएफसी (यूटीआय फायनांसीयल सेंटर) सुरू करण्याची घोषणा केली आहे.

देशभरात वितरण व गुंतवणूकदारांना अधिक चांगली सुलभ सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आखण्यात आलेल्या निश्चित विस्तार योजनेचा एक भाग म्हणून कंपनीने २० जानेवारी २०२५ रोजी ३३ नवीन यूटीआय वित्तीय केंद्रे (शाखा) सुरू करण्याची घोषणा केली आहे. देशभरातील गुंतवणूकदारांशी दृढ संबंध प्रस्थापित करण्यासाठी व अधिक समावेशक गुंतवणूक संस्कृतीस प्रोत्साहन देण्यासाठी यूटीआय एएमसीच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा हा महत्त्वाचा भाग आहे.

# समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी न्याय विभाग व प्रशासनाने पुढाकार घ्यावा

## न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फलके यांचे प्रतिपादन; विधी सेवा महाशिबिराचे उद्घाटन

**लोकशाही वार्ता/वर्धा**

समाज सशक्त झाला तर देश सशक्त होईल, यासाठी समाजाला सशक्त करण्यासाठी तळागातील शोषित, वंचित, दुर्बल, गरिबांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांची आर्थिक उन्नती होणे आवश्यक आहे. याकरीता शासन राबवित असलेल्या विविध योजनेच्या लाभासोबतच न्याय मिळवून देण्यासाठी न्याय व प्रशासनांनी एकत्र येण्याची गरज असल्याचे प्रतिपादन उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर तथा वर्धा जिल्ह्यातील पालक न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फलके यांनी विधी सेवा महाशिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी केले.

विकास भवन येथे महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय मुंबई, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय व वकील संघ वर्धाच्या संयुक्त विद्यमाने विधी सेवा महाशिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश संजय भारुका होते तर जिल्हाधिकारी वान्मथी सी., जिल्हा पोलीस अधिक्षक अनुराग जैन, जिल्हा सत्र न्यायाधीश एस.ए.एस.एम. आली, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव विवेक देशमुख, वकील संघाचे अध्यक्ष सुशांत राऊत, उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती.संविधानाने प्रत्येक नागरिकांना आपला हक्क



दिला असून न्याय आपल्या दारी हे ध्येय ठेवून विधी सेवा प्राधिकरणाच्यावतीने समाजातील प्रत्येक घटकांना समान न्याय देण्याचे कार्य करण्यासोबतच शासनाच्या योजनांपासुन वंचित असलेल्या नागरिकांना योजनांचा लाभ मिळण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे उर्मिला जोशी-फलके म्हणाल्या. विधी सेवा महाशिबिरातून लाभार्थ्यांनी योजनेचा लाभ घेऊन इतरांना लाभ घेण्यासाठी प्रोत्साहित करावे असे त्या म्हणाल्या.

प्रत्येक क्षेत्रात महिला या अग्रस्थानी आहेत. महिलांनी स्वतः सशक्त होणे गरजेचे आहे. शासन राबवित असलेल्या विविध योजना सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम प्रशासन करीत असते. त्यांच्या साथीला न्यायालय आल्यामुळे महाशिबिरातून योजना एकत्रितपणे पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांनी या योजनाचा लाभ घ्यावा व आपली प्रगती साधावी, असे आवाहन न्यायमूर्ती संजय भारुका यांनी केले.

केंद्र व राज्य शासनाच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या विविध योजनेचा सामान्य नागरिकांना लाभ मिळवून देण्यासाठी विविध विभागाच्यावतीने २३ स्टॉल लावण्यात आले असून या स्टॉलवर योजनांची सविस्तर माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. नागरिकांनी याचा लाभ घ्यावा. सेवा हक्क कायद्यांर्गत महसूल व इतर विभागाच्या ऑनलाईन सेवा पुरवण्यात येत असून या सेवांचाही लाभ घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी केले. यावेळी पोलिस अधीक्षक अनुराग जैन यांनीसुध्दा आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाप्रसंगी मान्यवरांचे हस्ते विविध योजनेंतर्गत लाभार्थ्यांना ट्रॅक्टर, शिलाई मशिन, कृषि साहित्य, किटकनाशक स्प्रे पंप, स्व. गोपीनाथ मुंढे अपघात विमा योजनेंतर्गत धनादेश, आवास योजनेतील लाभार्थ्यांना प्रमाणपत्र तसेच मुद्रा योजनेंतर्गत कर्ज मंजुरीचे प्रमाणपत्र देण्यात आले आहे. तसेच कार्यक्रमाचे उत्कृष्ठ नियोजन केल्याबद्दल विधी सेवा प्राधिकरणच्या कर्मचाऱ्यांचे कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक न्यायधिश पेडगावकर यांनी केले कार्यक्रमाचे संचालन प्रतिभा शेजवळ- काळे यांनी केले तर आभार विवेक देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाला न्यायिक अधिकारी, वकील, अधिवक्ता, लाभार्थी, व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विधी सेवा महाशिबिरातील विविध योजनेच्या स्टॉलला मान्यवरांनी भेटी देऊन कृषि विभागाच्या स्टॉलचे मान्यवरांचे हस्ते फित कापून उद्घाटन करण्यात आले.

# नीलेश ठोंबरे तथा धनंजय बकाणे यांचा भाजपमध्ये प्रवेश



**लोकशाही वार्ता/हिंगणघाट**

आमदार समीर कुणावार यांच्या नेतृत्वावर विश्वास टाकत हिंगणघाट नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष निलेश ठोंबरे व माजी नगरसेवक धनंजय बकाणे यांचा राज्यमंत्री ना. पकंज भोयर, आमदार समीर कुणावार यांच्या हस्ते तथा माजी खासदार रामदास तडस जिल्हाध्यक्ष सुनील गफाट आमदार राजेश बकाणे आमदार सुमीत वानखेडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पक्ष प्रवेश सोहळा संपन्न झाला. यावेळी दोन्ही नेत्यांच्या प्रवेशांनी हिंगणघाट शहरातील पक्ष संघटनेला बळकटी मिळाली असल्याची भावना आमदार समीर कुणावार यांनी व्यक्त केली असून पक्षात त्यांचे सहर्ष स्वागत असल्याची प्रतिक्रिया उपस्थित मान्यवरांनी दिली यावेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष किशोर दिघे, वसंतराव आंबटकर,युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अंकुश ठाकूर, जिल्हा महामंत्री आकाश पोहाणे, संजय डेहणे,भूषण पिसे, संजय माडे, आशिष पर्बत, विनोद विटाळे,वामण चंदनखेडे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्रमदानातून परिसर स्वच्छ करून प्रवाशी निवाऱ्याची केली रंगरंगोटी

## युवा संघर्ष संघटनेचा उपक्रम; अन् बदलला प्रवासी निवाऱ्याचा चेहरा

**लोकशाही वार्ता/वर्धा**

अस्वच्छतेचा कळस गाठलेला पिपरी मेघे येथील प्रवासी निवारा युवा संघर्ष संघटनेच्या पुढाकाराने श्रमदानातून स्वच्छ करण्यात आला. प्रवासी निवारा परिसर स्वच्छ झाल्याने प्रवाशांना दिलासा मिळाला आहे.

अस्वच्छतेने कळस गाठल्याने पिपरी मेघे येथील कारला चौक परिसरातील प्रवासी निवारा येथे वाहनांची प्रतीक्षा करणाऱ्यांना दुर्गंधीचा सामना करावा लागत होता. संबंधित प्रवासी निवारा स्वच्छ करण्यात यावा, अशी मागणी स्थानिक स्वराज्य संस्था असलेल्या ग्रामपंचायत प्रशासनाकडे नोंदविण्यात आली.



पण दुर्लक्ष करण्यातच ग्रामपंचायत प्रशासन धन्यता मानत होती. अखेर संबंधित समस्या युवा संघर्ष सामाजिक संघटनेच्या पदाधिका-यांना कळली. त्यानंतर प्रशासनाच्या दुर्लक्षीत कारभाराचा निषेध म्हणून विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या उपक्रमादरम्यान प्रवासी निवारा परिसर स्वच्छ करून रंगरंगोटी करण्यात आली. त्यामुळे प्रवाशांना आता दिलासा मिळाला आहे. विशेष म्हणजे यापूर्वी संबंधित संस्थेच्यावतीने ठिकठिकाणी वृक्षलागवड उपक्रम राबविण्यात आला आहे. या उपक्रमात सोनू खांडेकर, गजानन वानखेडे, सुधीर वसू, गजानन भातकुलकर, महेंद्र लोखंडे, आनंद धामणकर, महेश भस्मे, रमेश आंबटकर, राकेश टागोर, हरीश कनोजे, दीपक गुडेकर, सुनील भागवतकर, पद्माकर खेकडे, रजत धुर्वे, सुरज वानखेडे, साहिल ढवळे, नयन राऊत, अरविंद सहारे, पद्माकर ढोणे, मोहन मोहिते, योगेश भोंडवे, गुणवंत घसाट, आदित्य दाते, राजेंद्र सूर्यवंशी, भरत मुडे, दिनेश कोकाटे, पुंडलिक राऊत, अखिलेश बुधबावरे, दिनेश घोडे, सतीश चिमणे, अमोल खानजोडे, विजू तळवेकर, प्रभाकर बुरसे, भूषण नागतोडे, संजय भुरे, शंकर ढोक, अरविंद लोहे, अनिकेत पांढरे, प्रशिल चरडे, मनोज जगताप, राज ठाकरे, गजानन भोयर, प्रदीप श्रीरसागर, भगवान गडकरी, नकुल वाघमारे, अमन ढुमणे, अविनाश मेश्राम, राजदत्त रणनवरे, गोविंदा उईके, राजाभाऊ देशमुख, सुरेश पिसे, पराग पिंपळे, अनिकेत दाते आदींनी सहभाग घेतला.

## हद्दपारीचे उल्लंघन करणाऱ्यावर गुन्हा दाखल

**वर्धा:** सहा महिन्यांकरिता हद्दपार असताना आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. ही कारवाई रामनगर पोलिसांनी केली. सिंदी (मेघे) येथील रत्नाकर माणिक किन्नाके यास सहा महिन्यांकरिता हद्दपार करण्यात आले होते. पण, परवानगी न घेता दखलपात्र गुन्हा करण्याच्या अनुषंगाने आला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांना तो घरी मिळून आला. त्याच्याकडे परवानगी नव्हती आणि समाधानकारक उत्तरही मिळाले नाही. हद्दपारीचे उल्लंघन केल्याप्रकरणी रामनगर पोलिसांनी कारवाई करत गुन्हा दाखल केला. पोलिसांचा पुढील तपास सुरू आहे.

# अवैध वाळू तस्करी करणाऱ्यांकडून ट्रॅक्टर जप्त

**लोकशाही वार्ता/ हिंगणघाट**

पोलिसांनी अवैध वाळू तस्करी करणाऱ्यांकडून वाळूसह ट्रॅक्टर जप्त करण्यात आला. ही कारवाई येथील पोलिस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने केली.

वणा नदीच्या डकिंग पात्रातून वाळूचे अवैध उत्खनन करून शहरात वाहतूक करीत असल्याच्या माहितीच्या आधारावर गुन्हे प्रकटिकरण पथक व पोलिसांनी लोटन चौक येथे नाकाबंदी केली. हिंगणघाट टाउनकडे येणाऱ्या ट्रॅक्टरला थांबण्याचा इशारा देऊन थांबविले. ट्रॅक्टर व ट्रॉलीची पंचासमक्ष पाहणी केली असता



ट्रॉलीमध्ये वाळू भरून असल्याचे दिसले. वाहन चालकाने त्याचे नाव पराते (वय ३९) रा.माता मंदिर वॉर्ड हिंगणघाट असे सांगितले. सदर वाहन मालक व चालक स्वतः असल्याचे व वाहणाचे कागदपत्र नसल्याबाबत सांगितले. त्याच्या ताब्यातून वाळू, ट्रॅक्टर, ट्रॉली असा ५ लाख ७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी ट्रॅक्टर चालकाविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला. ही संपूर्ण कार्यवाही पोलिस अधीक्षक अनुराग जैन, अप्पर पोलिस अधीक्षक डॉ. सागरकुमार कवडे, उपविभागीय पोलिस अधिकारी रोशन पंडित यांच्या निदेर्शानुसार पोलिस निरीक्षक मनोज गभने, प्रभारी पोलिस निरीक्षक चंद्रकांत पाटील यांच्या आदेशाने पोलिस स्टेशन हिंगणघाट येथील गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलिस हवालदार प्रशांत ठोंबरे, राहुल साठे, विवेक वाकडे, मंगेश वाघमारे, आशिष नेवारे, विजय काळे यांनी केली.

# वर्धा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची सेलू भूमी अभिलेख कार्यालयावर कारवाई

## भू-करमापक नरेश चंद्रकांत जाधव याला केली अटक, ५ हजार रुपयांची स्वीकारत होता लाच

**लोकशाही वार्ता/वर्धा**

राष्ट्रीय महामार्गात संपादित केलेल्या जमिनाची मोजणी संदभार्तील सूयुक्त अहवाल देण्यासाठी सेलू येथील भूमापरक नरेश जाधव याने शेतकऱ्याला सहा हजाराची लाच मागितली, लाचेच्या रकमेपैकी पाच हजार स्वीकारतांना लाचलूचपत विभागाणे रांगेहाथ पकडले.

घटनेची थोडक्यात हकीकत याप्रमाणे आहे की,तक्रारदार यांचे आईचे नावाने असलेली शेतजमीन मौजा दोराली सर्व्हे नंबर ३३ त . सेलू जिल्हा वर्धा ही सन २०२०- २१ मध्ये भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांनी संपादित केली असून त्या जमिनीतील विहिरीच्या जागेचा मोबदला मिळाला नसल्याने त्याबाबत उपअधीक्षक भूमी अभिलेख विभाग यांचे कार्यालयकडून पंचनामा करून त्याचा संयुक्त मोजणी अहवाल उप विभागीय अधिकारी वर्धा यांना पाठविण्यासाठी आरोपी लोक सेवक नरेश जाधव यांनी आज दि २०/१,/२५ रोजी रुपये ६०००/- मागणी करून पडताळणी दरम्यान ५०००/- मागितल्याचे निष्पन्न झाले व पांचासमक्ष रुपये ५०००/- स्वीकारल्याने आरोपी लोकसेवक नरेश जाधव यास ताब्यात घेण्यात आले असून पोलिस स्टेशन.सेलू जिल्हा वर्धा येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील करवाई पोलिस उपअधीक्षक वैशाली वैरागडे व त्यांची टीम करीत आहे.

# स्वामित्व योजना नागरिकांच्या आर्थिक सुरक्षेची हमी

## राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांचे प्रतिपादन; लाभार्थ्यांना मिळकत पत्रिका वाटप

**लोकशाही वार्ता/वर्धा**

मिळकत पत्रिका (प्रॉपर्टी कार्ड) मिळणे आपल्या सर्वांसाठी अभिमानाची गोष्ट आहे. या योजनेची सुरुवात महाराष्ट्रातल्या मोजा सोनोरी तालुका पुरंदर येथून झाली आहे. याची दखल केंद्र शासनाने घेतली आणि ही योजना फक्त महाराष्ट्रापुरती मर्यादित न राहता याचा फायदा संपूर्ण भारत देशातल्या लोकांना झाला पाहिजे ही भूमिका केंद्र सरकारने घेतली ही महाराष्ट्रासाठी गौरवाची बाब आहे. वर्धा जिल्ह्यातील नागरिकांना आज स्वामित्व योजनेअंतर्गत मिळकत पत्रिका मिळाली असून स्वामित्व योजना ही नागरिकांच्या आर्थिक सुरक्षेची हमीच आहे असे प्रतिपादन राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केले. यासाठी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभारही मानले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात आयोजित प्रॉपर्टी कार्ड वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. जिल्हाधिकारी श्रीमती वान्मथी



सी., मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, निवासी उपजिल्हाधिकारी शिवराज पडोळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानदा फणसे उपस्थित होते.

राज्यातील ५० टक्के लोकसंख्या ग्रामीण भागातील असून या स्वामित्व योजनेंतर्गत ग्रामीण भागातील पिढ्यान्पिढ्या स्वतःच्या घरात वास्तव्यात असलेल्या मात्र घराचे मालकी हक्क नसलेल्या कुंटूंबांना आता मालकी हक्क प्रमाणपत्रामुळे जमीनीचे हस्तांतरण, विक्री, शासकीय योजनेच्या लाभासोबतच आर्थिक व्यवहारासाठी महत्वाचे ठरणार आहे. पुर्वी मालकीहक्क नसल्यामुळे आपसी जागेबाबत मोठ्या प्रमाणात वाद विवाद होऊन न्यायालयात दाखल होणाऱ्या प्रकरणाचे प्रमाण सुध्दा कमी होणार आहे. सोबतच अतिक्रमीत जागेवर झालेल्या बांधकामे नियमानुकुल करण्यास मदत होईल असे डॉ. पंकज भोयर म्हणाले.

नागरिकांना आपले हक्क मिळावे व आपसातील वाद मिटावे यासाठी केंद्र व राज्य शासनाच्यावतीने स्वामित्व योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत गावांच्या गावठाणांतील जमिनीचे ड्रोण व्दारे सर्वेक्षण व गावठाण भूमापण करुन डिजीटल पुरावे तयार करण्यात आले. यामुळे नागरिकांना आता मालकी हक्काचा कायदेशिर पुरावा मिळणार आहे. जिल्ह्यातील ८० टक्के नागरिकांचे मालकी हक्क प्रमाणपत्र तयार करण्यात आले असल्याचे जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी सांगितले. जिल्ह्यातील एकुण १ हजार ३९३ गावांपैकी ७७० गावठाण भुमापन करावयाचे असुन ७११ गावांमध्ये गावठाण चौकशी काम पुर्ण झालेले आहे. त्यापैकी ६६० गावांच्या सदन व मिळकत पत्रिका तयार झालेल्या असल्याचेही श्रीमती वान्मथी सी. म्हणाल्या. स्वामित्व योजनेंतर्गत नागरिकांना देण्यात येणारे मालकी हक्क प्रमाणपत्र हे सात बारा पेक्षा जास्त महत्वाचे असून यामुळे जमीनीच्या आर्थिक व्यवहारासोबतच योजनेचा लाभ मिळण्यासाठी फायदेशिर ठरणार असल्याचे जितीन रहमान यावेळी म्हणाले.

कार्यक्रमाप्रसंगी जिल्ह्यातील वर्धा तालुक्यातील महाकाळ, झाडगाव, देवळी तालुक्यातील कोळोणा (चोरे), मुरदगाव, वाटखेड, सेलू तालुक्यातील सुकळी, कान्हापूर, मोई या गावातील ३५ नागरिकांना प्रातिनिधिक स्वरुपात मान्यवरांचे हस्ते सनदचे वितरण करण्यात आले. तत्पुर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील चार राज्यातील व एका केंद्रशासीत प्रदेशातील स्वामित्व योजनेच्या लाभार्थ्यांशी संवाद साधून संपूर्ण देशातील स्वामित्व योजनेच्या लार्भाथ्यांना मार्गदर्शन केले. स्वामित्व योजनेंतर्गत राष्ट्रीय स्तरावर प्रापर्टी कार्डचे वितरण केले.

कार्यक्रमाला प्रभारी जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख संजय हुलके, उप अधिक्षक सुखदेव खोंडे, मोहन वनवे, प्रवीण लांबडे, विनोद माळोदे, शिरस्तेदार सुभाष भगत, प्रशांत देवघरे यांची उपस्थिती होती कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. ज्ञानदा फणसे यांनी केले. संचालन श्री. पाटील यांनी केले. जिल्ह्यातील स्वामित्व योजनेचे लाभार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# मकर संक्रांतीच्या महापर्वावर भव्य सूर्यनमस्कार, वैदिक हवन व हळदीकुंकू कार्यक्रम उत्साहात

## महिला पतंजली साई मंदिर योग कक्षाद्वारे उपक्रम



**लोकशाही वार्ता/वर्धा**

महिला पतंजली योग परिवार हिंगणघाट जिल्हा वर्धा अंतर्गत साई मंदिर योग कक्षा हिंगणघाट द्वारा सूर्यनमस्कार, वैदिक हवन व हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन निखाडे मंगल कार्यालय हिंगणघाट येथे करण्यातङ आले.

या कार्यक्रमाकरिता प्रमुख अतिथी म्हणून छायाताई सातपुते माजी नगरसेविका, प्रांजली अखुज, नीता बैलमारे प्रामुख्याने उपस्थित होत्या.

सर्वप्रथम वैदिक हवन करून योग प्राणायाम व सूर्यनमस्काराचे प्रात्यक्षिक व मार्गदर्शन योग शिक्षिका पौर्णिमा विजय धात्रक यांनी केले.. त्यानंतर हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाकरिता साई मंदिर योग कक्षेतील योगसाधिका, गौरक्षण योग कक्षेतील योगशिक्षिका प्राची पाचखेडे व योगसाधिका, शिवराई गार्डन योगकक्षेतील योगशिक्षिका शितल राऊत व योगसाधिका, बिडकर वार्ड योग कक्षेतील योगशिक्षिका सुषमा खोडे व योगसाधिका मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

गुड मॉर्निंग
लोकशाही वार्ता
# अकोला-वाशीम
नागपूर, मंगळवार, २१ जानेवारी २०२५/१०
epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta

## रिसोडमध्ये कीर्तन सोहळा

**लोकशाही वार्ता/वाशीम**

आयोध्या येथील प्रभू श्री राम मंदिर वर्धापन दिनाचे औचित्य साधून मातृ-पितृ पूजन सोहळ्याचे आयोजन महंत न्यायाचार्य नामदेव महाराज शास्त्री भगवानगड व महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार संत महंतांच्या उपस्थितीमध्ये २२ जानेवारीला सायंकाळी ७ ते ८ या वेळेत करण्यात आले आहे. तसेच यावेळी ग्रंथ तुलाही होईल.

# सात मिनिटांच्या अंतरात दोन अपघात; १२ जखमी

## रिसोड सेनगाव मार्गावर शाही धाब्याजवळची घटना

**रिसोड प्रतिनिधी**

७ मिनिटांच्या अंतरात एकाच ठिकाणी दोन वेगवेगळे अपघात होऊन यामध्ये १२ जण जखमी झाले असून, २ गंभीर आहेत. जखमींमध्ये ७ महिलांचा समावेश आहे. ही घटना रिसोड सेनगाव मार्गावर शाही धाब्याजवळ १९ जानेवारी रोजी रात्री १०.३० वाजता घडली.

याबाबत माहिती अशी की, रिसोडहून हिंगोलीच्या दिशेने जात असलेली एक कार चालकाचे नियंत्रण सुटल्याने रस्त्याच्या कडेला नालीमध्ये उतरली. सुदैवाने कारमध्ये असलेली एअर बॅग उघडल्याने प्रवास करत असलेल्या तिघांना किरकोळ मार लागला. मात्र कारचे खूप मोठे नुकसान झाले आहे. सदर कार ही नवीन असल्याचे बोलले जात आहे. ही घटना घडली त्याच ठिकाणी ७ मिनिटांच्या नंतर हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी येथून साखरपुड्याचा कार्यक्रम आटोपून रिसोड शहरातील पठाणपुरा भागातील नागरिक क्रुझर वाहनाने सेनगावच्या दिशेने रिसोडकडे येत होते. दरम्यान रस्त्याचे काम सुरू असल्या कारणाने रस्त्यावरच मातीचा ढिगारा साचलेला होता. क्रुझर ही थेट मातीच्या ढिगाऱ्यावर चढली. या अपघातामध्ये क्रुझरमधील सायरा बी सरदारखान (४२), शमीम परविन एजाज खान (४०), सरदारखान इस्माईल खान (८०), सुलताना बी नसिर खान (३५), जायदाबी सय्यद रज्जाक (६५), हसीना बी उमरखान (३५), फरजाना बी असलम खान (५०) आणि ताहेरा बी इस्माईल खान (६५) हे जखमी झाले. सर्व जखमींना रिसोड येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारार्थ भरती करण्यात आले.



सर्व जखमींवर वैद्यकीय अधिकारी डॉ. गजानन वाशिमकर, परिचारिका स्वाती मुंडे, कक्षसेवक प्रल्हाद डाखोरे, विश्रांती रेठे (कक्षसेवक) यांनी उपचार केले. जखमींमध्ये सायराबी सरदार खान व शमीम परविन एजाज खान यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचाराकरिता वाशीम येथे रवाना करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच पठाणपुरा भागातील नागरिकांनी ग्रामीण रुग्णालयात मोठी गर्दी केली होती. क्रुझरमधील अन्य दोघा-तिघांना किरकोळ मार लागला असून, त्यांच्याबद्दल माहिती मिळू शकली नाही.

रिसोड सेनगाव या राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू आहे. सेनगावकडून येणाऱ्या रस्त्याच्या डाव्या बाजूचे काम चालू असल्याकारणाने या ठिकाणी मातीचा ढिगारा टाकलेला आहे. जेणेकरून वाहनधारकांनी वळण रस्त्याचा वापर करून उजव्या बाजूने रस्त्याचे काम पूर्ण झालेले आहे त्यावरून आपली वाहने नेणे अपेक्षित आहे. मात्र याठिकाणी रस्ता कामाच्या ठेकेदाराकडून वळण रस्ता असलेल्या कोणत्याही प्रकारचा दिशा फलक लावलेला नव्हता.

त्यामुळे हा अपघात झाल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. अपघात झाल्यानंतर काही नागरिकांनी बाजूच्या शेतात पडलेला वळण रस्ता दिशादर्शक फलक उचलून रस्त्यावर आणून ठेवला. जेणेकरून यानंतर अपघात होऊ नये. ठेकेदाराने या ठिकाणी उपाययोजना करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# बांधकाम कामगारांचे आजपासून आझाद मैदानावर उपोषण

## ऑनलाईन पोर्टल पूर्णतः सुरू करण्याची मागणी

**लोकशाही वार्ता/नागपूर**

महाराष्ट्रातील ५४ लाख बांधकाम कामगारांचे ऑनलाइन पोर्टल पूर्णपणे सुरू न झाल्यास २१ जानेवारीपासून मुंबई येथील आझाद मैदान येथे राज्यातील बांधकाम कामगार संघटना संयुक्त कृती समीतीच्या झेंड्याखाली हजारो बांधकाम कामगार बेमुदत उपोषण सुरू करणार आहेत.

समितीच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, देशात सर्वात मोठा उद्योग धंदा असलेले बांधकाम क्षेत्र आहे. ९३ टक्के कामगार याच असंघटित कष्टकरी कामगार क्षेत्रात गणले जातात. सध्या महाराष्ट्रामध्ये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे २८ लाख नोंदणीकृत बांधकाम कामगार आहेत. इतकेच नव्हे तर २६ लाख बांधकाम कामगारांचे अर्ज प्रलंबित आहेत. म्हणजेच एकूण ५४ लाख बांधकाम कामगारांचे काम सध्या पूर्णपणे बंद पडल्याच्या अवस्थेत आहे. या मंडळाचे सचिव विवेक कुंभार यांनी आचारसंहितेच्या नावाखाली काम करता येणार नाही, असे सांगून सर्व कामकाज बंद पाडले. याची काहीच आवश्यकता नव्हती. त्यामुळे मुंबई उच्च न्यायालयामध्ये या निर्णयाविरुद्ध कामगार संघटना संयुक्त कृती समितीने केस दाखल केली होती.

६ नोव्हेंबर २०२४ रोजी मुंबई उच्च न्यायालयाने एका दिवसात पूर्वी असलेले सर्व कामकाज ऑनलाइन पद्धतीचे सुरू करण्यात यावे, असा आदेश दिला. परंतु जाणीवपूर्वक बड्या कंत्राटदारांचे भले करण्यासाठी लाखो कामगारांना सगळ्या लाभांपासून वंचित ठेवण्यासाठी या मंडळाचे सचिव विवेक कुंभार यांनी तालुका पातळीवर ऑनलाईनचे काम करण्यात येईल असे घोषित करून प्रत्यक्षात मात्र मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी केलीच नाही. या अन्यायाविरुद्ध नागपूर विधानसभेवर १८ डिसेंबरला बांधकाम कामगारांनी प्रचंड मोर्चा काढला. त्यानंतर २ जानेवारी रोजी कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्याशी चर्चा होऊन त्यांनी बांधकाम कामगारांचे पोर्टल पूर्ववत सुरू करण्यात येईल, असे आश्वासन दिले होते.पण प्रत्यक्षात पोर्टल सुरू न झाल्याने समितीचे निमंत्रक शंकर पुजारी यांनी कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्याशी ९ जानेवारीला फोनवरून संपर्क साधला. त्यावेळेस कामगार मंत्र्यांनी सांगितले की, पोर्टल पूर्ववत सुरू करण्यासाठी सॉफ्टवेअरचे कामकाज सुरू आहे.

लवकरच पोर्टल सुरू होईल. दरम्यान कंत्राटी पद्धतीने दिलेली तालुका कामगार सेवा केंद्रे पूर्ण कुचकामी ठरली असून, त्या ठिकाणी दलाला मार्फत कामगारांचे उघडपणे शोषण चालू आहे. खरे कामगार या सेवा केंद्राकडे फिरकत नाही. दलाल गावागावात घरी जाऊन अर्ज भरून घेतात आणि कामगारांना पहाटे ४ वाजता पासून रांगेत उभे राहण्यास सांगतात. त्यांना वेळेवर टोकन नंबर दिला जातो, पण पुढील कारवाई होत नाही. परिणामी सेवा केंद्रावर प्रचंड गोंधळ निर्माण होऊन भांडणे होऊन धक्काबुक्की होत असल्याचे व्हिडिओ सर्वत्र व्हायरल होत आहेत.

याबाबत असंख्य तक्रारी होत असूनही त्यांची दखल घेतली जात नाही. म्हणूनच अशा एकूण भ्रष्टाचारी कारभारा विरोधात २१ जानेवारीपर्यंत जर पोर्टल सुरू झाले नाही, तर महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटना संयुक्त कृती समितीच्या नेतृत्वाखाली कामगार आणि त्यांच्या साथीला हजारो कामगार बेमुदत उपोषण करणार आहेत. हे बेमुदत उपोषण आंदोलन यशस्वी सर्व जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकारी व सहाय्यक कामगार आयुक्तांना तेथील कामगार संघटनांनी निवेदन देऊन चर्चा करावी, असे आवाहन शंकर पुजारी, सागर तायडे, विनिता बाळेकुंदरी, राजकुमार होळीकर, प्रशांत रामटेके, प्रशांत मेश्राम, आनंद भालेराव यांनी केले आहे.

## वाशीम शहरातील गुंठेवारी नियमित करण्याची अर्ज प्रक्रिया सुरू

**लोकशाही वार्ता/वाशिम**

राज्यभर गुंठेवारी नियमित करण्याची प्रक्रीया सुरू असताना वाशिम शहरात ही प्रक्रिया बंद होती. ही बाब लक्षात घेऊन आ. भावना गवळी यांनी या संदर्भात नगर परिषद मुख्याधिकारी गायकवाड व संबधित अधिकाऱ्यांची बैठक घेवून या संदर्भात सविस्तर चर्चा केली. त्यानंतर वाशिम शहरातील गुंठेवारी नियमित करण्याची प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश दिले. १९ जानेवारीपासून स्थानिक जनसंपर्क कार्यालयात अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली.

गुंठेवारी कायद्यांतर्गत पूर्वीची घरे नियमित करण्याचा निर्णय यापूर्वी राज्य सरकारने घेतला होता. या गुंठेवारी नियमितीकरणामुळे अनियमित बांधकामे नियमित होतात, भूखंड आणि बांधकामांची खरेदी-विक्री अधिकृत होते, बांधकामांना अधिकृत दर्जा मिळतो. त्यामुळे शहरातील नागरिकांना गुंठेवारीचा मोठा फायदा होतो. परंतु गुंठेवारी नियमित करण्याची प्रक्रीया वाशिम शहरात बंद होती. यावर २०२१ मध्ये आ. भावना गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली गुंठेवारी नियमित करण्यासंदर्भात शिवसेनेने पुढाकार घेतला होता. मात्र, काहींनी यात खोडा घातल्याने प्रक्रिया थांबली होती. आता ही प्रक्रिया सुरू झाली असल्याने वाशिम शहरातील नागरिकांनी अनधिकृत भूखंडाचे नियमीतीकरण करण्याकरिता विहीत नमुन्यात अर्ज सादर करावा. या अर्ज प्रकरणाकरीता शिवसेना पदाधिकारी पुढाकार घेणार आहेत.

# अल्पवयीनांच्या हाती वाहनाचे 'स्टिअरिंग' घातकच

## जिल्हाधिकाऱ्यांचा पालकांना इशारा



**लोकशाही वार्ता/वाशिम**

जिल्ह्यात अल्पवयीन मुलांकडून वाहन चालवण्याचे प्रकार वाढत आहेत. ही बाब गांभीर्याने घेत जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांनी अल्पवयीनांच्या हाती वाहनांचे 'स्टिअरिंग' देणे अत्यंत घातक ठरेल, असा इशाराच पालकांना दिला आहे. सोबतच अल्पवयीन मुलांना गाडी चालवायला देऊ नका, अन्यथा योग्य ती कारवाई केली जाईल, असेही त्यांनी ठणकावले आहे.

संपूर्ण देशभरात वाहन चालवण्यासाठी किमान वय १८ वर्ष असणे बंधनकारक आहे. परंतु, काही पालक मुलांच्या हट्टाखातर किंवा गाफील राहून त्यांना दुचाकी आणि चारचाकी चालवण्याची परवानगी देतात. यामुळे अनेक अपघात होत आहेत आणि बळींची संख्याही वाढत आहे.

अल्पवयीन मुलांनी वाहन चालवल्यास कोणता कायदा लागू होतो? याची माहितीही जिल्हाधिकाऱ्यांनी दिली आहे. यामध्ये भारतीय मोटार वाहन कायद्यानुसार, १८ वर्षांखालील व्यक्ती वाहन चालवताना आढळल्यास त्यांच्या पालकांवर किंवा वाहन मालकावर कारवाई केली जाऊ शकते. मोटार वाहन कायदा १९८८ नुसार अल्पवयीन वाहनचालक पकडल्यास पालकांवर दंड आणि शिक्षा होऊ शकते. वाहन मालकाचे ड्रायव्हिंग लायसन्स रद्द होण्याची शक्यता असते. संबंधित अल्पवयीन मुलास वयाची २५ वर्षे पूर्ण होईपर्यंत ड्रायव्हिंग लायसन्स मिळत नाही. भारतीय दंड संहितेनुसार जर अपघात घडला आणि जीवितहानी झाली, तर पालक किंवा वाहन मालकावर आयपीसी कलम ३०४-अ अंतर्गत खटला दाखल केला जाऊ शकतो.

गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रात अल्पवयीन वाहनचालकांमुळे झालेल्या अपघातांचे प्रमाण वाढले आहे. काही प्रकरणांमध्ये निष्काळजीपणामुळे गंभीर दुखापती, तसेच मृत्यू झाले आहेत. पालकांनी आपल्या मुलांना वाहतुकीचे नियम शिकवणे आणि त्यांची जबाबदारी पटवून देणे अत्यंत गरजेचे आहे.

जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांनी सांगितले की, अल्पवयीन वाहनचालकांमुळे अपघात आणि मृत्यूच्या घटना वाढत आहेत. त्यामुळे अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी वाहतूक विभाग आणि पोलिसांकडून कठोर कारवाई केली जाईल. त्यांनी पालकांना जबाबदारीने वागण्याचे आवाहन केले आहे. तसेच, शाळा आणि महाविद्यालयांनीही विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक नियमांबद्दल जागरूकता निर्माण करण्याची सूचना केली आहे.

# हल्ला करणाऱ्यावर कडक कारवाई करा

## सरपंच संघटनेचे तहसीलदारांना निवेदन

**लोकशाही वार्ता/रिसोड**

ग्रामपंचायत चिखलीच्या सरपंच मनिषा रमेश अंभोरे यांचे पती रमेश श्रीराम अंभोरे यांच्यावर प्राणघातक हल्ला करणाऱ्या आरोपींवर कायदेशीर कार्यवाही करावी अशी मागणी सरपंच संघटनेच्या वतीने करण्यात आली. यासंदर्भात तहसीलदार व पोलिसांना सोमवार, २० जानेवारीला लेखी निवेदनही देण्यात आले.

निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, सरपंच संघटनेची एक सभा पंचायत समिती सभागृहात २० जानेवारीला घेण्यात आली. यामध्ये ग्रामपंचायत चिखलीच्या सरपंच मनिषा रमेश अंभोरे यांचे पती रमेश श्रीराम अंभोरे यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला. सदर हल्ल्यात रमेश श्रीराम अंभोरे हे गंभीर जखमी झाले. हा हल्ला सरपंचांनी गावातील दारू, मटका, जुगार यासारखे अनेक अवैध धंदे बंद केल्यामुळे करण्यात आल्याचे सांगण्यात आले. हल्ल्यामुळे सरपंचांच्या कुटुबियांच्या जीवित्वास धोका निर्माण झाला आहे. या घटनेचा परिणाम



राज्यातील इतर सरपंचांवर झाला असून, सर्वत्र भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. हा विषय अत्यंत गंभीर असून, सखोल चौकशी व तपास करून दोषांवर कारवाई करण्यासोबतच चिखलीच्या सरपंच व त्यांच्या कुटुंबियांना न्याय द्यावा. याशिवाय राज्यातील सर्वच सरपंचांना संरक्षण देण्यात यावे.

निवेदनावर सरपंच संघटनेचे अध्यक्ष बळीराम बोडखे (सरपंच, भापूर), उपाध्यक्ष दुर्गा गरकळ (सरपंच, मांडवा), सचिव शोभा जाधव (सरपंच, गणेशपूर/पाचांबा), कार्याध्यक्ष स्वप्निल देशमुख (सरपंच, पिंपरी सरहद) उपाध्यक्ष शत्रुघ्न बाजड (सरपंच, वडजी), कोषाध्यक्ष अश्विनी कोकाटे (सरपंच, मोरगव्हाण) सहसचिव उषा जाधव (सरपंच, निजामपूर) सहसचिव राणी प्रहार परहाड (सरपंच, बाळखेडा), संघटन प्रमुख आरती अवचार (सरपंच, किनखेडा) सदस्य दिपक बाळकर (सरपंच, जोगेश्वरी), भारतभाऊ नागरे (सरपंच, कुहा) स्वप्निल बोडखे (सरपंच, धोडप बु.), विकासभाऊ हाडे (सरपंच, गोहगांव) आशाताई सरकटे (सरपंच, हराळ), रुपाली मवाळ (सरपंच, महागांव), राधिका हागे (सरपंच, वाडी भोकरखेडा), गजाननराव बाजड (सरपंच, नावली), गौ. प. इंगळे, सुनिता थोरात, जी. एस. इंगळे, मनिषा अंभोरे, विष्णु जाधव, शांतीकुमार वाघ, संगीता गायकवाड आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# सरपंचपदाची उद्या आरक्षण सोडत

## जिल्ह्यातील २० ग्रा.पं.चा समावेश

**लोकशाही वार्ता/अकोला**

आगामी काळात निवडणूक होणाऱ्या जिल्ह्यातील २० ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाची आरक्षण सोडत जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात बुधवार २२ जानेवारीला सकाळी ११.३० वाजता होणार आहे. याबाबत जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी सूचना जारी केली.

जिल्ह्यातील ४ मार्चपर्यंत निवडणूक होणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाचे अनुसूचित जाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग, खुला प्रवर्ग आदींबाबत आरक्षण निश्चित करण्यासाठी सोडत आयोजिण्यात आली आहे. सोडतीत तेल्हारा तालुक्यातील उमरी आणि अकोली रूपराव, अकोट तालुक्यातील केळपाणी व केळपाणी बु., मूर्तिजापूर तालुक्यातील कव्हळा, शेलू बाजार, किनखेड व लंघापूर, तसेच बाळापूर तालुक्यातील हिंगणा निंबा व शिंगोली ग्रापंचा समावेश आहे. त्याचप्रमाणे, बार्शिटाकळी तालुक्यातील भेंडीसूत्रक व चोहोगाव, पातूर तालुक्यातील सांगोळा, कोठारी बु., आस्टुल, भंडारज बु., तुलंगा बु. तसेच अकोला तालुक्यातील आखतवाडा, अनकवाडी व मजलापूर या गावांसाठी आरक्षण सोडत होणार आहे. सर्व तहसीलदार व गटविकास अधिकाऱ्यांनी उपस्थित राहण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील व या ग्रामपंचायतींच्या नागरिकांनीही उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# अकोला-खडकी ते मलकापूर फ्लॉयओव्हर मार्गावर जिवंत काडतूस

**लोकशाही वार्ता/अकोला**

शहरालगत असलेल्या खडकी ते मलकापूर फ्लॉयओव्हरकडे जाणाऱ्या रस्त्यावर बेवारस स्थितीत जिवंत काडतूस मिळाल्याने खळबळ उडाली असून, या संपूर्ण प्रकरणाची कसून चौकशी करण्यात यावी, अशी मागणी वजा तक्रार प्रवीण हुंडीवाले यांनी खदान पोलिस ठाण्यात दिली आहे.

किसनराव हुंडीवाले यांची ६ मे २०१९ रोजी न्यास नोंदणी कार्यालय येथे निर्घृण हत्या करण्यात आली. तेव्हापासून प्रवीण हुंडीवाले यांच्या सुरक्षिततेसाठी दोन अंगरक्षक तैनात करण्यात आले आहे. आता सध्या पोलिस शिपाई मयूर सिसोदे व नायक दारासिंग सुखदाने असे दोन कर्मचारी २४ तास तैनात आहेत. १० जाने. २०२५ रोजी रात्री ८ वाजता सिसोदे हे कर्तव्यावर आले आणि ११ जानेवारी रोजी अंगरक्षक मयूर सिसोदे व महिंद्र शांताराम लंगोटे यांच्यासोबत दैनंदिन पहाटे फिरण्याकरिता जाऊन परत येत असताना मलकापूरहुन खडकीकडे येत असताना हॉटेल बैठक व हरिओम टेंट हाऊस समोरील रोडवर एक तांब्याचे जिवंत काडतूस रस्त्यावर बेवारस स्थितीत पडलेले दिसून आले.

अंगरक्षक मयूर सिसोदे व महिंद्र शांताराम लंगोटे यांच्यासोबतच हुंडीवाले यांनी सदर काडतुसची पाहणी केली असता, ते जिवंत असल्याचे दिसून आले. जातांना मात्र आम्हाला काही दिसून आले नाही. परंतु परत येताना जिवंत काडतूस सापडणे ही अतिशय गंभीर बाब आहे. यामुळे आम्ही चिंताग्रस्त झालो आहोत. कारण नेहमी पहाटे फिरण्याचा हा दररोजचा मार्ग असून कोणीतरी माझ्यावर नियमित पाळत ठेवत आहे. घातपात करण्यासाठीच रेकी करीत असल्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे पोलिसांमध्ये माहीत देणे कर्तव्य असून अंगरक्षकांनी तक्रार करण्याबाबत समज दिली. असे तक्रारीत नमूद केले आहे. दरम्यान, अतिमहत्त्वाची नियोजित कामे पूर्ण करून संपूर्ण माहिती आणि जिवंत कडतुससह हुंडीवाले यांनी अंगरक्षक यांच्यासमक्ष पोलिस स्टेशनला तक्रार दिली आहे. यापूर्वीसुद्धा जीवे मारण्याच्या धमक्या व आरोपीकडून माझ्या नित्यानियमाने बसत असलेल्या ठिकाणी रेकी व पाळत ठेवली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. यातूनच सदरचे जिवंत काडतूस कोणीतरी अनोळखी इसमाने नेहमीच्या मार्गात टाकल्याचे दिसून येते.

# सद्‌गुरू पंचाक्षर शिवाचार्य स्वामीजींचा ११८ वा जन्मोत्सव भक्तिभावाने साजरा

## अकोलानगरीत भव्य-दिव्य आध्यात्मिक सोहळा

**लोकशाही वार्ता/अकोला**

श्रीसद्‌गुरू दमया स्वामी जंगममठ संस्थान संचालित श्रीक्षेत्र मन्मथधाम संस्थांनाचे प्रेरणा व श्रद्धास्थान, महातपस्वी ३२ वे मठाधिपती ष.ब्र.१०८ श्री सद्‌गुरू श्री पंचाक्षर शिवाचार्य महास्वामींचा ११८ वा जन्मोत्सव भक्तिभावाने साजरा करण्यात आला. यानिमित्त सानिध्य व अमृत हस्ते श्रीमद काशी ज्ञानसिंहासनाधीश्वर श्री श्री श्री १००८ जगद्‌गुरू डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामी काशी यांचे १७ जानेवारीला अकोला महानगरात आगमन झाले.



आगमनानंतर सकाळी ८. ३० वाजता भव्य मिरवणूक व डोळे दिपवणारी शोभायात्रा काढण्यात आली. सोबतच सद्‌गुरू पंचाक्षर शिवाचार्य स्वामींचा ११८ वा जन्मोत्सव पाळणा म्हणून व तुला करून साजरा करण्यात आला. त्यानंतर राज्यस्तरीय वीरशैव श्री पंचाक्षर सेवारत्न पुरस्कार-२०२५ सन्मान सोहळा पार पडला. याप्रसंगी अध्यक्ष श्री ष.ब्र. १०८ श्री सद्‌गुरू डॉ. विरूपाक्ष शिवाचार्य, श्रीसद्‌गुरु दमयास्वामी जंगममठसंस्थान, बाळापूर, कपिलाधर, संभाजीनगर श्रीगुरुपंचाक्षर जंगममठ संस्थान अकोला यांच्या वतीने आणि आदरणीय शिवाचार्य यांच्या उपस्थितीत प पू श्री ष ब्र श्रीकंठ शिवाचार्य स्वामी, नागन्सूर, नीलकंठ शिवाचार्य स्वामी, मैंदर्गी, सोमलिंग शिवाचार्य स्वामी, बिचकुंदा, सिद्धदयाल शिवाचार्य स्वामी बेटमोगरा, पंडिताराध्य शिवाचार्य स्वामी वाडागली, महादेव शिवाचार्य स्वामी वाईकर, दिगंबर शिवाचार्य स्वामी, सिद्ध चैतन्य शिवाचार्य स्वामी साखरखेर्डा आदींच्या सान्निध्यात सोहळा पार पडला.

याप्रसंगी आ. हरीश पिंपळे, डॉ.रविकांत कोल्हे, सोहळ्याचे मुख्य संयोजक चंद्रशेखर एकघरे उपस्थित होते. याप्रसंगी धार्मिक, साहित्यिक, सामाजिक, शैक्षणिक, प्रशासकीय, औद्योगिक, व्यापार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या मान्यवरांचा 'राज्यस्तरीय वीरशैव श्री पंचाक्षर सेवारत्न पुरस्कार-२०२५' देऊन सत्कार करण्यात आला. शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, पुणेरी पगडी,रुद्राक्ष माळ, हार असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

यात जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हाधिकारी सिद्धराम सालीमठ, डॉ. शामा घोणसे, श्रावण जंगम, बाबासाहेब कोरे, शारदा एकघरे, डॉ. उदय सांगळोदकर, लता कोल्हे, प्रा. दीपाली सोसे, शिवप्रसाद जटाले, डॉ.अशोक सांगवीकर, हनुमंत पाटील, मल्लिकार्जुन पाटील, पूजा तापडिया, आरती मालपाणी, श्रावण जंगम, प्रा. ज्योती स्वामी यांचा समावेश आहे. आयोजन समितीच्या वतीने प्रा. रविकांत कोल्हे आणि चंद्रशेखर एकघरे यांनी सर्वांचे आभार मानले.

# जिल्ह्यात २३६ ग्रामपंचायतींची 'टीबी'मुक्तीकडे वाटचाल

## शून्य प्रमाण आणण्यासाठी शोधमोहीम व उपचारांना गती द्यावी -जिल्हाधिकारी

**लोकशाही वार्ता/अकोला**

जिल्ह्यात २३६ ग्रामपंचायतींची टीबीमुक्तीकडे वाटचाल होत आहे. क्षयरुग्णांचे प्रमाण व मृत्यू शून्यावर आणण्यासाठी शोध मोहीम व उपचारांना गती द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज दिले. जिल्हा टीबी फोरमची बैठक जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनात झाली, त्यावेळी ते बोलत होते.

जिप.चे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. वैष्णवी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. मनीष शर्मा, महापालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. आशिष गिऱ्हे, शहर क्षयरोग अधिकारी डॉ. निखील लहाने यांच्यासह सर्व तालुका आरोग्य अधिकारी बैठकीला उपस्थित होते. प्रारंभी डॉ. शर्मा यांनी क्षयरोग निर्मूलनासाठी होणाऱ्या प्रयत्नांबाबत सादरीकरण केले.

जिल्हाधिकारी कुंभार म्हणाले की, क्षयरोग निर्मूलन मोहिमेत टीबीमुक्त ग्रामपंचायतींना पुरस्कार दिला जातो. जिल्ह्यातील सर्व गावे टीबीमुक्त करण्याचे ध्येय ठेवून मोहिमेला गती द्यावी. प्रौढांचे बीसीजी लसीकरण ऐच्छिक आहे. तथापि, ७५ हजारांहून अधिक व्यक्तींनी पूर्वनोंदणी केली आहे. त्यात सध्या ३४ टक्के लसीकरण झाले आहे. हे काम पूर्ण करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

जिल्हाधिकारी पुढे म्हणाले की, क्षयरुग्णांच्या संपर्कातील व्यक्तिंच्या 'सीवायटीबी' तपासण्या करून त्यांना आवश्यकतेनुसार उपचार मिळवून देण्यासाठी मोहीम हाती घेतली जात आहे. तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी या मोहिमेचे परिपूर्ण नियोजन व अंमलबजावणी करावी. जिल्ह्यात डिसेंबर २०२४ पर्यंत क्षयरोगाच्या ३१८२ रुग्णांची नोंद झाली. त्यांच्यावर औषधोपचार करण्यात येत आहे. २०२३ मध्ये ३ हजार रुग्ण होते. त्यापैकी २७१९ रुग्ण बरे झाले. क्षयरुग्ण तपासणीत ९२ व्यक्ती एचआयव्हीबाधित असल्याचे आढळले.

त्यांच्यावर औषधोपचार होत आहेत. निःक्षय पोषण योजनेत क्षयरुग्णांच्या खात्यात औषधोपचार सुरू असेपर्यंत डीबीटीद्वारे दरमहा १००० रुपये जमा केले जातात. खासगी डॉक्टरांकडे उपचार घेणाऱ्या रुग्णांनाही हा लाभ मिळतो. या योजनेचा लाभ जिल्ह्यातील २४२६ रुग्णांनी घेतला. निःक्षयमित्र योजनेत दाते मिळवून क्षयरुग्णांना आवश्यक पोषण आहार दिला जातो. विविध क्षेत्रांतील व्यक्तिंनी पुढाकार घेऊन त्यासाठी योगदान देण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रवींद्र आर्य, डॉ. गजानन इंगळे, डॉ. सायली कांबळे, डॉ. विजय बडगे, डॉ. प्रवीण चव्हाण, इंडियन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रकुमार सोनोने आदी उपस्थित होते. वसंत उन्हाळे, कपील होळकर, हेमंत भाकरे, उमेश पद्मने आदींनी सहकार्य केले.

## शेतातील विहिरीतील मोटारपंप लंपास

**लोकशाही वार्ता/यवतमाळ**

शेतातील विहिरीत सिंचनासाठी लावलेला १५ हजार ६९० रुपयांचा मोटारपंप अज्ञात चोरट्याने लंपास केला. ही घटना १३ जानेवारीला मध्यरात्री उमरखेड तालुक्यातील विडुळ शिवारात घडली. विठ्ठल प्रभाकर अल्लेवार (४४) रा. विडुळ असे मोटारपंप चोरीस गेलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. घटनेनंतर त्याने उमरखेड पोलीस ठाणे गाठून याप्रकरणी तक्रार दिली. त्यावरून अज्ञात चोरट्याविरुद्ध भा.न्या.सं. ३०३(२) कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

गुड मॉर्निंग

लोकशाही वार्ता

# यवतमाळ

नागपूर, मंगळवार, २१ जानेवारी २०२५/१२

## तीन महिलांनी लांबविले दागिने

**लोकशाही वार्ता/दिग्रस** - येथील सोनार लाईन येथील एका सोनाराच्या दुकानात चोरीच्या प्रकारात तीन अनोळखी आरोपींनी सामील होऊन मोठ्या प्रमाणात सोन्याची चोरी केली. फिर्यादी संतोष रोडा यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, १८ जानेवारी रोजी तीन आरोपींनी संगणमत करून फिर्यादीच्या दुकानात चोरी केली. फिर्यादीच्या दुकानात एक मुलगी मास्क घातलेली आणि दोन महिलांनी स्कार्फ बांधून दुकानात प्रवेश केला. त्यांनी सोन्याचा २२ कॅरट. ५९.९८० ग्रॅम वजनाचा सोन्याचा दागिना, किंमत ४ लाख ३० हजाराचा चोरून नेला. फिर्यादी संतोष रोडा यांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंद केला आहे.

epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta

### मंत्री संजय राठोड यांचा दारव्हा येथे नागरी सत्कार

# यापुढे जिसका साथ उसी का विकास - संजय राठोड

**लोकशाही वार्ता/दारव्हा**

दारव्हा येथे मृदा व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांचा भव्य नागरी सत्कार संपन्न झाला. या कार्यक्रमात विविध सामाजिक संघटना, स्थानिक नागरिक तसेच महायुतीच्या सर्व पक्षांचे स्थानिक नेते आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.यावेळी कार्यकर्त्यांकडून जेसीबीने पुष्पवृष्टी करत ना.राठोड यांचे स्वागत करण्यात आले.



कार्यक्रमाचे अध्यक्ष जीवन पाटील होते, तर प्रमुख पाहुण्यांमध्ये भाजपचे स्थानिक नेते प्रा. डॉ. अजय दुबे, शिवसेना जिल्हाध्यक्ष श्रीधर मोहोड, पराग पिंगळे, दत्तात्रय राहाणे, शिवसेना तालुकाध्यक्ष मनोज सिंगि, राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष पवार सर, कृ.उ.बा.स सभापती सुभाष राठोड आणि उपसभापती सुशांत इंगोले यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात "वंदे मातरम" गीताने झाली. त्यानंतर मंत्री संजय राठोड यांनी आपल्या भाषणात मतदारसंघातील विविध विकासकामांवर भर दिला. त्यांनी जनतेचा विश्वास कायम राखण्याचा निर्धार व्यक्त केला आणि जातपातीच्या राजकारणावर टीका करत, बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारधारेवर चालून कार्य करणार असल्याचे स्पष्ट केले.

राठोड यांनी जलसंधारण क्षेत्रातील महत्वाच्या प्रकल्पांचा उल्लेख केला. त्यांनी विदर्भातील ११ जिल्ह्यांमध्ये १००० कोटी रुपयांच्या निधीतून धरणे आणि बंधारे उभारण्याची योजना जाहीर केली, ज्याचा उद्देश टँकरमुक्त महाराष्ट्र घडवणे आहे. शेतकऱ्यांसाठी सिंचनाच्या सुविधा वाढवण्यावर विशेष भर दिला असून, शेतमालाला योग्य बाजारपेठ उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले. युवकांच्या बेरोजगारीच्या समस्येवरही त्यांनी चर्चा केली आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावर भर देणार असल्याचे आश्वासन दिले. कार्यकर्त्यांना सोडणार नसल्याचे सांगून त्यांनी आपल्या मंत्रिपदाची जबाबदारी भान ठेवून निभावण्याचे वचन दिले. मंत्री संजय राठोड यांनी जनसेवा, आरोग्य सुविधा आणि मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करण्याचे वचन देत, महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी कार्यरत राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

## सर्पदंशाने शेतकऱ्याचा मृत्यू

**हिवरा (संगम) :** एका शेतकऱ्याचा सर्पदंशाने मृत्यू झाला. ही घटना महागाव तालुक्यातील आनंदनगर येथे घडली. संजय रंगराव कवाने (५२) रा. आनंदनगर असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. संजय कवाने हे आपल्या शेतातील गोठ्यामध्ये दैनंदिन कामे करीत होते. यावेळी पाण्याच्या टाकीच्या बाजुला विळखा देऊन बसलेल्या एका विषारी सापाने त्यांच्या पायाला दंश केला. काही क्षणातच त्यांच्या अंगात विष भिनले. तसेच प्रकृती चिंताजनक झाली. ही बाब निदर्शनास आल्यानंतर कुटुंबीयांनी त्यांना तातडीने यवतमाळ येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी नेण्याचा प्रयत्न केला. मात्र रुग्णालयात पोहोचण्याआधीच वाटेतच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगा असा आप्त परिवार आहे.

## वारा (कवठा) जवळ अपघात ३ जखमी

**लोकशाही वार्ता/पाटणबोरी**

२० जानेवारीला दुपारी १२ वाजता चे सुमारास कार व दुचाकी क्रमांक एमएच ०४ डिएम ३७०१ ने पिंपळखुटी जत्रेकरिता येत होते. पाटणबोरीकडे येताना विरोधी दिशेने जाणाऱ्या हुंदाई कार क्रमांक टीएस ११ ईएच ८८७६ ने जोरदार धडक दिली. धडक देताच दुचाकी वरील १ पुरुष व ३ महिला खाली कोसळल्या. त्यांना हाता पायाला व डोक्याला जबर मार बसला. वारा कवठा येथील नागरिकांच्या मदतीने १०८ गाडी बोलावून सर्व ४ जखमीना यवतमाळ येथे सरकारी रुग्णालय येथे पाठविण्यात आले.



अपघातात ३ जण गंभीर जखमी झाले. हा अपघात केळापूर अदिलाबाद मार्गावरील वाऱ्हा कवठा जवळ घडला. जखमींना यवतमाळ जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आल्याची माहिती आहे.

पांढरकवडा जवळील घोन्सी पोड येथील रहिवासी आहे. दुचाकी सध्या तिघांची प्रकृती चिंता जनक असल्याचे पोलिसांनी सांगितले. वृत्त लिहेपर्यंत कोणावरही गुन्हा नोंदविला गेला नव्हता. पोलिसांचा तपास सुरु आहे. जखमीची नावे कळाली नव्हती.

## जि.प. शिक्षण विभागाच्या निष्क्रियतेविरोधात शिक्षकांचा एल्गार!

**लोकशाही वार्ता/यवतमाळ**

जिल्हा परिषद,यवतमाळच्या शिक्षण विभागाच्या निष्क्रियतेविरोधात दिनांक २० जानेवारी (सोमवार) रोजी यवतमाळ जिल्हा परिषद कार्यालयासमोर शिक्षक संघटनांनी एकत्र येत जोरदार धरणे आंदोलन केले. महाराष्ट्र राज्य पदवीधर, प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख संघटना जिल्हा शाखा यवतमाळ यांच्या वतीने दुपारी १२ ते ५ या वेळेत एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.



शिक्षण व्यवस्थेतील अन्यायकारक कारभार,पदोन्नतीच्या रखडलेल्या प्रक्रिया आणि शासनाच्या दिरंगाईला कंटाळून शिक्षकांनी आज एल्गार पुकारला. ३३% विषय शिक्षकांना तातडीने वेतोन्नती मिळावी. विस्तार अधिकारी पदोन्नतीसाठी अचूक सेवाजेष्ठता यादी प्रसिद्ध करावी. उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून केंद्रप्रमुख पदोन्नती प्रक्रिया सुरू करावी. माध्यमिक शिक्षकांची पदे तातडीने पदोन्नतीने भरावी. मुख्याध्यापक पदोन्नतीकरिता सेवाजेष्ठता यादी प्रसिद्ध करावी. केप्र किंवा उच्चश्रेणी मुख्याध्यापक पदावर असलेल्या पदवीधर शिक्षकांच्या कपात झालेल्या वेतनवाढीचा अहवाल शासनाला सादर करावा. मराठी/हिंदी भाषा सूटचे आदेश त्वरित लागू करावेत. वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणीच्या प्रलंबित प्रकरणांचा निकाल त्वरित लावावा, अश्या मागण्या करण्यात आल्या आहे. आंदोलनाच्या वेळी शिक्षक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाच्या कामकाजावर तीव्र नाराजी व्यक्त केली. "शिक्षकांचे प्रश्न वारंवार शासनाच्या निदर्शनास आणून दिले तरीही कोणतीही ठोस कारवाई होत नाही.शिक्षकांवरील अन्याय सहन केला जाणार नाही. जर त्वरित योग्य तो निर्णय घेतला नाही,तर अधिक तीव्र आंदोलन छेडले जाईल," असा इशारा शिक्षक संघटनांनी दिला आहे.

## विद्यार्थ्यांना आत्मनिर्भर गुंतवणूकदार होण्यासाठी जागरूकता कार्यक्रम

### सीडीएसएल आयपीएफचे आयोजन

**लोकशाही वार्ता/यवतमाळ**

सीडीएसएल इन्व्हेस्टर प्रोटेक्शन फंडने (सीडीएसएल आयपीएफ) महाराष्ट्रातील दारव्हा येथे विद्यार्थ्यांसाठी गुंतवणूक जागरूकता कार्यक्रम आयोजित केला. हा उपक्रम ईश्वर देशमुख इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, यवतमाळ येथे आयोजित करण्यात आला.



आर्थिक साक्षरता वाढविणे आणि गुंतवणूकदारांना भांडवली बाजारातील त्यांच्या गुंतवणुकीसंदर्भात माहितीपूर्ण निर्णय घेण्यासाठी सक्षम करणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. तसेच गुंतवणुकीच्या मूलभूत तत्त्वांवरही या कार्यक्रमात भर देण्यात आला. उपक्रम अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावा, यासाठी हा कार्यक्रम मराठी भाषेत आयोजित करण्यात आला. वक्त्यांनी विद्यार्थ्यांसाठी गुंतवणुकीच्या संकल्पना सोप्या पद्धतीने मांडल्या आणि भांडवली बाजाराची ओळख व डिपॉझिटरी सेवा यांसारख्या विषयांवर माहिती दिली. भांडवली बाजारात आर्थिक समावेशन साध्य करण्यात गुंतवणूकदार शिक्षणाची भूमिका महत्त्वाची आहे. या दृष्टिकोनातून गुंतवणूकदारांना भांडवली बाजाराच्या गुंतागुंतीत आत्मविश्वासाने मार्गक्रमण करण्यासाठी आवश्यक ज्ञान व कौशल्ये प्रदान करणे आणि त्यांना आत्मनिर्भर गुंतवणुकदार बनविणे हा सीडीएसएल आयपीएफचा उद्देश आहे. आर्थिक साक्षरता प्रसारित करण्यासाठी कटिबद्ध असलेल्या सीडीएसएल आयपीएफकडून यावर्षी देशभरात आणखी गुंतवणूकदार जागरूकता कार्यक्रम राबवले जाणार आहेत.

### दृष्टिक्षेप

## भांडणाची मध्यस्थी मारहाणीत भोवली

**लोकशाही वार्ता/यवतमाळ**

भांडण सोडविण्यास गेल्याच्या कारणावरून एका महिलेला गावातीलच गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तीने काठीने बेदम मारहाण केली. या मारहाणीत संबंधित महिलेच्या हाताला आणि शरिराला गंभीर दुखापत झाली. ही घटना १८ जानेवारीला सकाळी आर्णी तालुक्यातील ईचोरा येथे घडली. चेन्न बाळु धोंगडे (३६) रा. ईचोरा असे या मारहाणीत जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. घटनेनंतर त्याने पारवा पोलीस ठाणे गातून याप्रकरणी तक्रार दिली. त्यावरून आरोपी सिध्दार्थ शिवराम सोनडवले (५७) रा. ईचोरा याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

## जिल्ह्यात ११ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई

**लोकशाही वार्ता/यवतमाळ**

जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस प्रशासन अलर्ट मोडवर आले आहेत. त्यातूनच दिवसा आणि रात्रीच्या गस्तीत वाढ करण्यात आली आहे. शिवाय सराईत गुन्हेगार, अवैध दारू विक्रेते, मटका बहाद्दर, जुगारी आणि सामाजिक शांतता भंग करणाऱ्यांवर प्रतिबंधात्मक कारवाया करण्याचा सपाटा पोलिसांनी चालविला आहे. त्याचाच एक भाग म्हणून आज १९ जानेवारीला जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यातंर्गत ११ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाया करण्यात आल्या.

## घरातील साहित्याची तोडफोड

**लोकशाही वार्ता/यवतमाळ**

चौसाळा रोड बोथड येथे घरातील साहित्याची चोरी करण्यात आली. याप्रकरणी घरामध्ये प्रवेश करून शिविगाळ केली व घरातील टी.व्ही. गाडी फोडुन नुकसान केले. तसेच थापडाबुक्याने मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी राजू रामदास यादव यांच्या तक्रारीवरून भावेश गोलू राजेंद्र तिवारी व अधिक एका विरुद्ध गुन्हा नोंद केला.

## लाडखेड येथे बसस्थानकात बस थांबत नसल्याने रास्तारोको

### आंदोलनामुळे यवतमाळ महामार्गावर वाहनांच्या रांगा



**लोकशाही वार्ता/दारव्हा**

दारव्हा तालुक्यातील लाडखेड येथे सोमवार दि.२० जानेवारीला सकाळी १० वाजताच्या सुमारास बसस्थानकात बस थांबत नसल्याच्या कारणावरून गावकऱ्यांनी रास्तारोको आंदोलन केले. सरपंच दिनेश इंगोले यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी या आंदोलनात उत्स्फूर्त सहभाग घेतला. रास्तारोकोमुळे यवतमाळ महामार्गावरील वाहतूक पूर्णतः ठप्प झाली होती, दोन्ही बाजूंनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

लाडखेड येथील सरपंच दिनेश इंगोले यांनी ठाम भूमिका घेत, जोपर्यंत संबंधित अधिकारी येऊन या प्रश्नावर तोडगा काढत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही, असे जाहीर केले होते. लाडखेड येथील बस स्थानकावर बस थांबत नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. गावातील अनेक विद्यार्थी दारव्हा, यवतमाळ, कारंजा या ठिकाणी शिक्षण घेत आहेत. आंदोलनात उपसरपंच सलीम शेख, ग्राम पंचायत सदस्य हम्मीत पठाण, विजय निमकर, संजय निमकर, जितेंद्र दुधे, सनीखान, प्रदीप मेश्राम, आकाश डेरे, अन्सार खान तसेच अन्य नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. ग्रामस्थांच्या या आंदोलनामुळे प्रशासनाचे लक्ष वेधले गेले असून, प्रवाशांना होणाऱ्या गैरसोयीबाबत तातडीने निर्णय घेण्याची मागणी होत आहे.

## सद्गुरू भगवंत माऊलींचा पुण्यस्मरण सोहळा भांब नगरीत साजरा

### आ. बाळासाहेब मांगुळकर यांनी दिली भेट

**लोकशाही वार्ता/आर्णी**

श्री सद्गुरू भगवंत अध्यात्म अनुसंधान शक्तीपीठ संस्थान भांब (राजा) येथे माऊलींचा ३६ वा पुण्यस्मरण उत्सव दि. १९ रोजी रविवारला साजरा झाला. या पुण्यस्मरण उत्सवाची सुरुवात १८ जानेवारीला सायंकाळी कलश स्थापना आणि दीप प्रज्वलन सिद्धचार्य भगवंत भूषण विष्णुपंत वाघ गुरुजी (लोणी) यांच्या सिद्ध हस्ते तसेच शक्तिपीठाचार्य सदगुरु साक्षी भगवंत विनोद महाराज आक्कावार (आर्णी) यांच्या प्रमुख उपस्थितीत व संस्थानचे समस्त कार्यकारी मंडळ तथा हजारो साधकांच्या साक्षीने करण्यात आले. १९ जानेवारीला ब्रह्म मुहूर्तावर



सामुदायिक ध्यानयोग, अजपाजप सोहम् धारणा, अंतमुर्खी साधना हजारो साधकांच्या लक्षणीय उपस्थितीत संपन्न झाली.

तद्नंतर "श्री" ची पालखी पादुका व समाधी पूजन शक्तीपीठाचार्य, सिद्धाचार्य व संस्थानचे अध्यक्ष सुदाम बोंद्रे तसेच ज्येष्ठ साधक नारायणराव तिरमारे यांच्या हस्ते करण्यात आले. तद्नंतर श्रींची पालखी व पादुका शोभायात्रा गावोगावांहून पायी वारी करत आलेल्या पालखींसोबत भजनी मंडळ, हरिपाठ मंडळ ज्यामध्ये लहानांपासून जेष्ठांपर्यंत सर्वांचाच लक्षणीय सहभाग होता. श्रींच्या पालखी सोहळ्याचे स्वागत संपूर्ण भांब नगरीत ठिकठिकाणी रांगोळी घालून करण्यात आले. संपूर्ण भांब नगरी भाविक भक्तांच्या, भजनी मंडळाच्या टाळ आणि मृदुंगाच्या गजरात न्हावून निघाली. या शोभायात्रेतील हरिपाठ मंडळात लहान मुलांमुलींचा सहभाग लक्षणीय व कौतुकास्पद होता. शोभायात्रेनंतर गोपाल काल्याचे नामसंकिर्तन साक्षी भगवंतांच्या मधुर वाणीतून झाले. कार्यक्रमाला यवतमाळचे आमदार बाळासाहेब मांगुळकर हे आवर्जून उपस्थित होते. प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी भांब आणि दर पौर्णिमाला लोणी येथे सत्संगाद्वारे साक्षी भगवंत आणि सिध्दाचार्यांचे ज्ञानदानाचे मोलाचे कार्य अविरत सुरू आहे. यावर्षीचा ३६ वा पुण्यस्मरण उत्सव म्हणजेच तृतीय तपोत्सव सोहळा हजारो साधक आणि भाविक-भक्तांच्या उपस्थितीत अतिशय उत्साहात आणि प्रसन्नमय वातावरणात पुण्यस्मरण सोहळा साजरा झाला. सूत्रसंचालन कांडलकर गुरुजी, संदीप ढोले, सोनल मनोज गादेवार यांनी केले. या कार्यक्रमाकरिता सद्गुरु भगवंत अध्यात्म अनुसंधान शक्तीपीठ संस्थानचे समस्त कार्यकारी मंडळ गावोगावावरून आलेली साधक मंडळी आणि भांब वासियांनी अथक परिश्रम घेतले.

## ऑटो उलटून अपघातात महिला ठार, तीन लेकरांचा आधारवड गेला

**लोकशाही वार्ता/वणी**

ऑटोत बसून घरी परतत असताना ऑटोचा अपघात झाला. ऑटोतून महिला बाहेर फेकल्या गेली. तिच्या डोक्याला जबर दुखापत झाल्याने तिचा घटनास्थळीच मृत्यू झाला. ही घटना रविवार, दि. १९ जानेवारीला सायंकाळी राजुर मार्गावरील सोना माता मंदीराजवळ घडली.

रंजना जंगमवार (४५) ही महिला राजुर येथील रहीवासी होती. ती लालपुलीया परीसरातील कोल डेपोमध्ये मजुरी करायची. सायंकाळी काम आटोपल्यानंतर गावी परत जाण्यासाठी ऑटोत बसली. राजुर मार्गावरील सोना माता मंदीराजवळ ऑटो चालक रहेमत रहीम खान याचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि झालेल्या अपघातात महिलेला जीव गमवावा लागला. ऑटोत खचाखच प्रवासी भरल्याचे बोलल्या जात असून वाहनावरील नियंत्रण सुटल्याने भीषण अपघात झाला. रंजना यांच्या डोक्याला मार लागल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. तीला दोन मुल व एक मुलगी आहे. तिच्या मृत्युमुळे लेकरं पोरकी झाली आहे. या प्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला .

## कुत्र्याच्या हल्ल्यात हरीण ठार

**यवतमाळ :** तालुक्यातील विठ्ठलवाडी येथील बेसुमार जंगलतोड झाल्याने तो परिसर मैदान झाले जगलात वनविभागाने प्राण्यांसाठी चारा पाण्याची कोणत्याच प्रकारे सुविधा नसल्याने वण्य प्राणी गावाचा आसरा घेत आहे. वन्य प्राणी हे शेजारच्या गावांमध्ये आणि पाणवठ्याजवळ हे प्राणी येण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. अशीच एक घटना तालुक्यातील विठ्ठलवाडी येथे रस्त्याच्या कडेला एका हरिणाचे लचके तोडल्याचे काहीना दिसून आले भटक्या कुत्र्यांनी हरणांची शिकार केली पुरेसा चारा आणि पाणी नसल्याने विठ्ठलवाडी कुरण नर्सरी मधील हरणे विठ्ठलवाडी गावाजवळ भटकत आहेत. सोमवारी पहाटे हरीण कुत्र्यांच्या तावडीत सापडली आणि गावठी कुत्रे हरणीच्या मागे लागले परंतु हरीण जीव वाचवत विठ्ठलवाडी रोड चा कडेला पडला आणि कुत्र्याने हरणाचे लचके तोडले. हरीण आपला जीव वाचवण्याचा प्रयत्न केला मात्र भटक्या कुत्र्यांनी हरणाला रात्रीच आपले भक्ष बनवले १६ तास होऊनही वनविभागाचे एकही अधिकारी घटनास्थळी पोहचले नव्हते.

## वणी येथे संताजी जगनाडे महाराज स्मृतिपर्वानिमित्त प्रेरणा यात्रेला प्रतिसाद

**लोकशाही वार्ता/वणी**

वणी येथे श्री संताजी जगनाडे महाराज स्मृतीपर्व समिती वणी च्या वतीने दिनांक १९ -१-२५ रोज रविवारला सकाळी ११ वाजता. तेली समाजाचे आराध्य दैवत आणि वारकरी संप्रदायातील थोर संत श्री.संताजी महाराज जगनाडे यांच्या स्मृति निमित्त वणी येथे प्रेरणा यात्रा वणी शहरातील तेली फैल (बसस्थानक) जवळुन काढण्यात आली.ही प्रेरणा यात्रा वणी शहरातील प्रमुख मार्गानी वणी येथील संताजी इंग्लिश मिडीयम स्कूल घ्या प्रांगणात प्रबोधनात्मक भाषणाने सांगता झाली.या कार्यक्रमाचे उद्घाटन हंसराज अहिर माजी केंद्रीय गृहमंत्री मंत्री ,तथा अध्यक्ष राष्ट्रीय मागास





वर्गीय आयोग यांच्या हस्ते झाले, या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती प्रतिभाताई धानोरकर खासदार चंद्रपूर, वणी, आर्णी लोकसभा मतदारसंघ, संजय देरकर आमदार वणी विधानसभा मतदारसंघ, तसेच आमदार बाळासाहेब मांगुरुळकर यवतमाळ विधानसभा क्षेत्र यांचा सत्काराचा कार्यक्रम आयोजन केले होते. या कार्यक्रमाचा अध्यक्ष संतोष ढवळे (जिल्हाध्यक्ष उबाठा) हे होते.प्रेरणा यात्रेचे स्वागताध्यक्ष नरेंद्र तराळे सेवावृत्त नगर परिषद अभियंता हे होते.दिनांक १८-१-२५ रोज शनिवारला दुपारी ३.३० वाजता श्री.संताजी महाराज जगनाडे यांच्या तैलचित्राचे अनावरण व भव्य बाईक रॅलीचे आयोजन केल्या गेले होते. तसेच संताजी महिला विचार मंच वणीच्या वतीने महिलांचे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या सर्व कार्यक्रमाला वणी शहरातील तसेच परिसरातील सर्व तेली समाज बंधुभगिनीं आपल्या कुटुंबासह मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी केल्या बद्दल श्री संताजी जगनाडे महाराज स्मृतीपर्व निमंत्रक समिती वणी व ज्ञान प्रसारक मंडळ वणी, संताजी महिला विचार मंच वणी, विदर्भ तेली समाज महासंघ वणी हनुमान मंदिर देवस्थान लाठी आखाडा वणी यांनी तेली समाज बांधवांचे आभार मानले.

## ईव्हीएम मतदान प्रणाली लोकशाही व्यवस्था सक्षम करणारे साधन आहे?

### २६ जानेवारीला नेर येथे राज्यस्तरीय खुली वादविवाद स्पर्धा

**लोकशाही वार्ता/नेर**

२६ जानेवारी २०२५ प्रजासत्ताक दिवसानिमित्त २५ व्या रौप्य महोत्सवी अभिनव बहुउद्देशीय संस्था नेर आणि दिवंगत नगरसेवक उमर शहा तुराब शाह यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ भव्य राज्यस्तरीय खुली वादविवाद स्पर्धांचे आयोजन निर्मलबन्सी लॉन येथे करण्यात आले आहे.



या वादविवाद स्पर्धांचे उद्घाटन संजय राठोड मंत्री मृद व जलसंधारण म.रा तथा पालकमंत्री यवतमाळ यांच्या हस्ते होईल, अध्यक्षस्थानी गजानन उईके प्राचार्य दि इंग्लिश हायस्कूल नेर राहतील तर प्रदिप झाडे, एन.यु.धांदे, सुभाषचंद्र भोयर, कविताताई भोयर, ॲड सलिम शाह, गजेंद्र कणसे, राजेंद्र चिरडे, डॉ. प्रविण बनसोड, विजयकुमार बुंदेला, दिवाकर ढोके, भाऊरावजी ढवळे, वैशालीताई मासाळ प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहे. यावेळी ठाणेदार राहुल आठवले, सरला दि इंगळे अभिनेत्री, प्रतिभाताई पवार अभिनेत्री,नितुताई गटलेवार सामाजिक कार्यकर्त्या, भास्करराव तिडके, के.संतोषकुमार दिग्दर्शक, अमृत वासनिक जेष्ठ पत्रकार, आनंद शिरसाट सामाजिक कार्यकर्ते या मान्यवरांचा सत्कार करण्यात येईल. यामध्ये आकर्षक प्रथम बक्षीसे ठेवण्यात आली आहे. वादविवाद स्पर्धांच्या स्पर्धकांना २६ जानेवारी २०२५ रविवारला दुपारी १२ वाजता उपस्थित राहणे आवश्यक आहे अटी, नियम आणि अडचणीकरीता मुख्य आयोजक नवनाथ दरोई यांच्याशी स्पर्धकांनी संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले आहे.